## अंदमान समुद्रात बोटीला जलसमाधी

ढाका : अंदमान समुद्रात मलेशियाकडे निघालेल्या एका बोटीचा अपघात होऊन अवैधरित्या प्रवास करणाऱ्या सुमारे २५० ते २८० प्रवाशांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. यामध्ये प्रामुख्याने रोहिंग्या मजूर आणि बांगलादेशी नागरिकांचा समावेश होता. या दुर्घटनेत आतापर्यंत केवळ ९ जणांना वाचवण्यात यश आले असून २५० हून अधिक प्रवासी अद्याप बेपत्ता आहेत. द डेली स्टार या वृत्तपत्राच्या वृत्तानुसार ही घटना ९ एप्रिल रोजी घडली. अनेक दिवस समुद्रात प्रवास केल्यानंतर खराब हवामान आणि प्रचंड लाटांमुळे बोट उलटल्याची माहिती समोर आली आहे.


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६


किंमत ४ ₹



**HIRING ALERT**

Looking For 2 waiters, 2 house boy
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.

Interested candidates may connect immediately on 8010169688 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com and Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.

## जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांना
# 105 कोटींची लॉटरी

- ■ १५ व्या वित्त आयोगाचा निधी खात्यात
- ■ विकासाची चार वर्षांची प्रतीक्षा संपणार

**सुयोग आंग्रे**
**। रायगड ।**

२०२६ च्या मार्चअखेर नव्याने निवडून आलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांना बंपर लॉटरी लागली आहे. मतदारसंघात विविध विकासकामांसाठी १०५ कोटी ४५ लाख ६१ हजार ९८० रुपयांचा निधी शासनाकडून मिळाला आहे. यामध्ये जिल्हा परिषद सदस्यांना ५२ कोटी ७२ लाख ८० हजार ९९० रुपये तर पंचायत समिती सदस्यांना ५२ कोटी ७२ लाख ८० हजार ९९० रुपयांचा निधी येणाऱ्या वर्षभरात मिळणार आहे. मागील चार वर्षे प्रशासक असल्याने हा निधी रखडला होता. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीवर प्रशासकांची राजवट संपून राजकीय राजवट सत्तेत आल्याने आता अनेक रखडलेल्या विकासकामांना वाव मिळणार आहे. यासाठी १५ व्या वित्त आयोगाचा निधी मैलाचा दगड ठरणार आहे.

जिल्हा परिषद रायगड अंतर्गत १५ व्या वित्त आयोगामधून २०२२-२३ ते २०२५-२६ या कालावधीतील रखडलेला निधी प्राप्त झाला आहे. यामुळे ग्रामीण भागातील विकासकामांना गती मिळणार आहे. ग्रामविकास विभागाकडून जिल्हा परिषद स्तरासाठी तब्बल ५२ कोटी ७२ लाख ८० हजार ९९० रुपये तर पंचायत समितीसाठीही ५२ कोटी ७२ लाख ८० हजार ९९० रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीचा उपयोग पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, तसेच विविध पायाभूत सुविधा उभारण्यासाठी करण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

रायगड जिल्हा परिषदेचा कारभार सुमारे चार वर्षे प्रशासकाच्या हाती होता. जिल्ह्यातील विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न प्रशासकांनी यंत्रणेच्या साहाय्याने केला. हा विकास जिल्हा नियोजन मंडळ आणि जिल्हा परिषद पंचायत समिती सेस आणि शासनाचा विविध विभागातूनयेणाऱ्या निधीतून करण्यात येत होता. केंद्र सरकारकडून येणारा १५ वित्त आयोगाचा निधी प्रशासक विराजमान असल्याने जिल्हा परिषदेला वर्ग करण्यात आला नव्हता. हा कालावधी तब्बल चार वर्षांचा आहे. सन २०२२ ते सन २०२६ या कालावधीमधील रखडलेला बंधित आणि अबंधित निधी रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीकडे वर्ग करण्यात आला आहे.

१५ व्या वित्त आयोगाचा चार वर्षे रखडलेला निधी तब्बल १०५ कोटी ४५ लाख ६१ हजार ९८० रुपयांचा आहे. •➤ पान २ वर

### ही कामे करता येणार

- **पाणीपुरवठा :** पिण्याच्या पाण्याची योजना, विहीर, बोअरवेल दुरुस्ती, जलवाहिनी टाकणे व दुरुस्ती.
- **स्वच्छ भारत अभियान :** शौचालय बांधकाम, गटार बांधकाम व सांडपाणी व्यवस्थापन.
- **घनकचरा व्यवस्थापन :** कचरा संकलन केंद्र, कचरा प्रक्रिया यंत्रणा, कचरा वाहने खरेदी.
- **आरोग्य व स्वच्छता सुविधा :** आरोग्य उपकेंद्र दुरुस्ती, स्वच्छता मोहिमा व पाणी गुणवत्तेची तपासणी.
- **ग्रामपंचायत पायाभूत सुविधा :** ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती, अंगणवाडी, शाळा दुरुस्ती

### ही कामे करता येणार नाहीत

मोठे रस्ते (प्रधानमंत्री ग्रामसडक योजना /इतर योजनेतील), खाजगी कामे किंवा व्यक्तीगत लाभ, कर्मचाऱ्यांचे पगार देणे, धार्मिक स्थळांवर खर्च व राजकीय कार्यक्रम खर्च या निधीतून करता येणार नाही.



## झोपडीधारकांना न्याय मिळवून देणार

**विरोधी पक्ष नेते अरविंद म्हात्रे यांचे आश्वासन**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महापालिकेतर्फे झोपड्यांना पुन्हा एकदा कर पावती सुरू करण्यात यावी, या मागणीसाठी नवनाथ नगर झोपडीधारकांनी महानगरपालिकेच्या प्रांगणात उपोषणाला बसले आहेत. विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन, त्यांचा प्रश्न व त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. यावेळी अरविंद म्हात्रे यांनी सदर झोपडीधारकांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात असलेल्या नवनाथ नगर झोपडपट्टीतीलकाहीझोपडीधारकांना त्यांच्या झोपड्यांसाठी नगरपरिषद असतानाच्या कालखंडामध्ये कर पावती दिली जात होती.

महापालिका अस्तित्वात आल्यानंतर त्या झोपडीधारकांना अवैध ठरवून त्यांची कर पावती रद्द करण्यात आली. आपण उघड्यावर येऊ ही भीती नागरिकांना सतावत आहे. •➤ पान २ वर

### वेधक

## चालकास मारहाण करणाऱ्यांना शिक्षा

**माणगाव :**एसटी चालकाला मारहाण करणाऱ्या तीन जणांना अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश मुकेश के. पाटील यांनी सक्त मजुरीसह दंडाची शिक्षा सुनावली आहे. फिर्यादी दिपक उमाजी खंडागळे, एस.टी. बस चालक हे पेण एस.टी. आगारात चालक म्हणून कार्यरत आहेत. ०५ जून २०१९ रोजी पेण ते पाली, एस.टी.घेवून येत असतांना नागोठणे एस.टी. बस डेपोमध्ये आत जात असताना आरोपी आखिब आबिद इलामी याने ताब्यातील मोटारसायकल बसच्या समोर आणली. •➤ पान २ वर

## सीबीएसई दहावीचा निकाल जाहीर

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्ड म्हणजेच सीबीएसईनं दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा निकाल ९३.७० टक्के लागला आहे. गेल्या वर्षी सीबीएसईच्या दहावीचा निकाल ९३.६६ टक्के होता, त्या तुलनेत यंदा निकालात सुधारणा झाली आहे. बोर्डानं यावेळी उत्तरपत्रिकांची तपासणी विक्रमी वेळेत पूर्ण करत निकाल दरवर्षीच्या तुलनेत एक महिना अगोदर जाहीर केला आहे. यंदा देखील सीबीएसईच्या दहावीच्या निकालात मुलींनी मुलांना मागं टाकत बाजी मारली आहे. मुलांच्या तुलनेत उत्तीर्ण होणाऱ्या मुलींची टक्केवारी अधिक आहे. सीबीएसईनं अधिकृतपणे टॉपर यादी जाहीर केली नाही.

## अकोल्यात उष्माघाताचा बळी ?

**अकोला :** विदर्भात उन्हाचा तडाखा तीव्र झाला असून हवामान विभागाकडून पुढील आठ दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. अकोला शहर सुमारे ४४ अंशांसह देशातील सर्वाधिक उष्ण शहर ठरले आहे. अकोला शहरातील जुने शहर पोलीस स्टेशन हद्दीत एका मालवाहू ऑटोमध्ये अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. याची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले, मृतदेहाच्या अंगावर कुठल्याही मारहाणीचा तसेच जखमा नाही. कदाचित या व्यक्तीचा उष्माघातामुळे मृत्यू झाला असावा, असा अंदाज पोलिसांनी या ठिकाणी व्यक्त केला आहे.

## मिठागरमधील अनेकांना बेघर करण्याचा घाट

- ■ नैसर्गिक आपत्तीच्या नावाखाली पुनर्वसनाच्या हालचाली सुरु
- ■ उपसरपंच आणि ग्रामसेविका झिराडकर यांची हातमिळवणी
- ■ माहितीच्या अधिकारात महेश ठाकूर यांनी उघड केली माहिती

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मिठागरमधील अनेकांना बेघर करण्याचा घाट प्रशासनाचा सुरु झाला आहे. नैसर्गिक आपत्ती, दरड कोसळण्याच्या नावाखाली ३० हून अधिक घरांचे पुनर्वसन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. उपसरपंच मंदा ठाकूर यांच्यासह विजय ठाकूर व ग्रामसेविका नेहा झिराडकर यांची हात मिळवणी असल्याचा आरोप करण्यात आला असून घर मालकींची कोणतीही संमती न घेता हा कारभार सुरु असल्याचा प्रकार महेश ठाकूर यांनी माहितीच्या अधिकारात उघड झाला आहे. खामदे आणि सावली येथील घरांचे स्थलांतरित करण्याच्या तयारीत असल्याचा आरोपही ठाकूर यांनी केला आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.

महेश ठाकूर यांनी केलेल्या तक्रारीनुसार, मुरूड तालुक्यातील मिठागर हे गाव असून २८० घरांची वस्ती असलेले गाव आहे. या घरांपैकी ३० हून अधिक घरे डोंगर भागालगत आहेत. मात्र या घर मालकांची संमती न घेता, या घरांतील नागरिकांचे पुनर्वसन करण्याच्या हालचाली मंदा ठाकूर, विजय ठाकूर यांनी केल्या आहेत. त्यात त्यांना ग्रामसेविका नेहा झिराडकर मदत करीत आहेत.

कष्टाने बांधलेल्या या घरांचे पुनर्वसन करण्याच्या हालचाली उपसरपंच मंदा ठाकूर यांच्यासह विजय ठाकूर यांच्या माध्यमातून सुरु झाल्या आहेत. मिठागर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष असलेले विजय ठाकूर यांनी अलिबागचे उपविभागीय अधिकारी यांना पत्र देऊन डोंगरालगत असलेल्या घरांना तडे गेले आहेत, तेथील घरांवर दरड कोसळून वित्त व जीवितहानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ६९ जणांच्या घराचे पुनर्वसन होणे आवश्यक असून पर्यायी जागा म्हणून उसरोली येथे पर्यायी जागा देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. मात्र याबाब घरमालकांची कोणताही संमती घेण्यात आली नाही. पुनर्वसन व स्थलांतराच्या नावाखाली येथील नागरिकांना बेघर करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप महेश ठाकूर यांनी केला आहे. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी शासनाकडे पुनर्वसनासाठी पाठपुरावा ही मंडळी करीत आहेत.

### कारवाईची मागणी

गावे स्थलांतरीत होण्यासाठी करण्यात आलेले पत्रव्यवहार खोटे आहेत. त्यामुळे त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात यावी. उपसरपंचसह विजय ठाकूर, ग्रामसेविका नेहा झिराडकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा. गावांतील लोकांची व शासनाची दिशाभूल करणाऱ्यांविरोधात कारवाई करावी अशी मागणी महेश ठाकूर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

## पालीत डंपरचा पुन्हा धुमाकूळ

- ■ दोन दुचाकी उडवल्या; अपघातांची मालिका थांबेना
- ■ ओव्हरलोड डंपर वाहतूक व अपघातांमुळे नागरिक संतप्त

**। पाली । प्रतिनिधी ।**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात सोमवारी (दि.१३) रात्री एका बेभान डंपरने आगरआळी जवळ रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोन दुचाकींना जोरदार धडक देऊन उडवले. या अपघाताच्या वेळी दुचाकींजवळ कोणीही नसल्याने जीवितहानी टळली. मात्र, वारंवार होणाऱ्या या अपघातांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

या अपघातात दुचाकींचे मोठे



नुकसान झाले आहे. पाली शहरात गेल्या काही महिन्यांपासून डंपरमुळे होणाऱ्या अपघातांचे सत्र सुरूच आहे. यापूर्वी फेब्रुवारी महिन्यात महावितरणचे कर्मचारी अनंत सोनवणे यांना एका भरधाव डंपरने पाठीमागून धडक दिली होती. सोनवणे यांनी प्रसंगावधान राखून गाडीवरून उडी मारल्याने त्यांचे प्राण वाचले, मात्र त्यांच्या कंबरेला गंभीर दुखापत झाली होती. त्या घटनेत •➤ पान २ वर

> नगरपंचायतीने सकाळी ७ ते रात्री ८ या वेळेत अवजड वाहतूक शहरातून पूर्णपणे बंद करण्याचा ठराव (क्र. १९७) संमत केला आहे. या संदर्भात २७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन कार्यवाहीची मागणीही करण्यात आली आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश प्राप्त झाल्यानंतर, प्रशासनाच्या वतीने अवजड वाहतूक बंदीबाबतचे पुढील अधिकृत आदेश निर्गमित केले जातील.
>
> -सुलतान बेनसेकर, उपनगराध्यक्ष, नगरपंचायत पाली

## विशेष मोहिमेचा विद्यार्थ्यांना मिळणार आधार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. २० एप्रिलपर्यंत ही मोहिम असणार आहे. अकरावी, बारावीच्या विज्ञान शाखेतील सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना या मोहिमेचा आधार मिळणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमांतर्गत ही विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे. त्याची सुरुवात रायगड जिल्ह्यात सुरु करण्यात आली असून जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी समितीकडे त्वरित अर्ज करण्यात यावे, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तथा सदस्य जयंत चाचरकर यांनी केले आहे.

अकरावी व बारावीच्या विज्ञान शाखेत, अभियांत्रिकी पदविका व पुढील उच्च शिक्षणासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वेळेत जात वैधता प्रमाणपत्र वेळेत मिळत नसल्याची ओरड कायमच असते. प्रमाणपत्र न मिळाल्याने अनेकवेळा विद्यार्थ्यांना या प्रवेशापासून वंचित राहण्याची परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे या विद्यार्थ्यांना बिकट संकट निर्माण होते. विद्यार्थ्यांची ही समस्या दुर करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने पुढाकार घेतला आहे. •➤ पान २ वर

## कारची हवा काढणाऱ्या वृद्धाची हत्या

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

पार्किंगवरून झालेल्या वादात कारची हवा काढणाऱ्या वृद्धाला दोन तरुणांनी बेदम मारहाण केली. त्यात गंभीर जखमी झालेल्या वृद्धाचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी हत्येचा गुन्हा नोंदवून दोन तरुणांना बेड्या ठोकल्या आहेत. नरेश वाघेला असे मृताचे नाव आहे, तर शहानवाज शेख आणि साहिल घाडगे अशी आरोपींची नावे आहेत. वाघेला यांच्या घराबाहेर शेखने आपली कार पार्क केली. त्यावरून दोघांमध्ये वाद झाला. रागाच्या भरात वाघेला यांनी शेखच्या कारच्या चाकामधली हवा काढली. त्यावरून वाद आणखी विकोपाला गेला. दोघांनी जाब विचारत मारहाण सुरू केली. वाघेला बेशुद्ध होत कोसळले.

## रायगडमध्ये ४३४५ विद्यार्थ्यांना आरटीईची लॉटरी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांसाठी झालेल्या ऑनलाइन सोडतीत ४ हजार ३४५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी शाळांमध्ये शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

रायगड जिल्ह्यातील २७० शाळांमध्ये ४ हजार ७८४ जागा शिक्षण हक्क कायद्यांतर्गत राखीव ठेवल्या आहेत. यासाठी एकूण ९ हजार ४८९ अर्ज प्राप्त झाले होते. राखीव जागांपेक्षा दुप्पट अर्ज आल्याने शालेय शिक्षण विभागामार्फत पारदर्शक पद्धतीने ही सोडत काढण्यात आली.

जिल्ह्यातील विविध खासगी विनाअनुदानित शाळांमधील रिक्त जागांसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त झाले होते. त्यातून संगणकीकृत प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली असून, पालकांना एसएमएसद्वारेही माहिती दिली आहे. यातील ६२ विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया अंतिम करण्यात आली आहे. आरटीईअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणासह शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. यामध्ये शिक्षण शुल्क, पाठ्यपुस्तके, गणवेश यांचा समावेश असून, शासनाकडून त्याचा खर्च संबंधित शाळांना दिला जाणार आहे. त्यामुळे गरीब व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची दारे खुली झाली आहेत.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी ठरवून दिलेल्या कालावधीत आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

> यंदा आरटीई प्रवेश प्रक्रियेला पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला असून, शिक्षणाच्या हक्काबाबत जागरूकता वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रशासनाकडून प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी विशेष यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली होती. एकूणच, या लॉटरीमुळे हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग सुकर झाला असून, त्यांच्या भविष्यासाठी ही संधी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.
>
> -ललिता दहीतुले, प्राथमिक शिक्षणाधिकारी-रायगड.

## पेट्रोल-डिझेल महागणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सध्या देशात पेट्रोल सुमारे १०४ ते १०६ रूपये प्रति लिटर आणि डिझेल ९४ ते ९६ रूपये प्रति लिटर दराने विकले जात आहे. दरम्यान इराण-अमेरिका युद्धाचे थेट परिणाम सामान्यांच्या खिशाला चटके देण्याची शक्यता आहे. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा फटका लवकरच ग्राहकांना बसण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांच्या मते, आगामी काळात पेट्रोल सुमारे १८ रुपये तर तर डिझेल तब्बल ३५ रुपयांनी महाग होऊ शकते. त्यामुळे महागाईत मोठी वाढ होण्याची भीती व्यक्त होत आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर वाढत असल्याने देशातील इंधन दरांवर दबाव वाढत आहे. •➤ पान २ वर


**मुश्रीफांच्या सुपुत्राने अडवला शेतकऱ्यांचा रस्ता | शेतकऱ्यांनी मागितली तहसीलदारांकडे दाद**

## मंत्री पुत्राची दबंगगिरी; हवालदिल शेतकरी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात राज्याचे मंत्री हसन मुश्रीफ यांची मानकीवली येथे तर त्यांच्या सुपुत्राच्या नावावर पोशिर येथे जमीन आहे. वडिलांच्या मंत्रीपदाचा वापर करीत त्यांच्या मुलाने पोशीर येथील जमिनीवर दगडी कुंपण घालण्यास सुरुवात केली असून आजुबाजूच्या शेतकऱ्यांचा रस्ता अडविला आहे. दरम्यान, रस्ता अडवला गेल्याने शेतकरी अडचणीत आला असून त्यांनी माध्यमांना याबाबत माहिती देत कर्जत तहसीलदारांना निवेदन दिले आहे.

पोशीर गावातील स्थानिक शेतकरी परशुराम गोपाळ हाबळे



यांची शेती सध्या अडचणीत आली आहे. त्यांच्या शेतीकडे जाण्याचा रस्ता दगडी बांधकाम सुरू करून अडवण्यात आला आहे. मागील आठ ते दहा दिवसात तेथे बांधकाम करून शेतकऱ्याचा रस्ता बंद करण्याचा प्रताप मंत्री पुत्राने केला आहे. पूर्वीपासून शेतीसाठी लागणारी अवजारे नेण्यासाठी या रस्त्याचा वापर केला जात होता. त्यामुळे शेतकऱ्याला शेती करण्यासाठी हा रस्ता खुला करण्यात यावा, यासाठी १६ मार्च रोजी तहसीलदार डॉ. जाधव यांना पत्र देण्यात आले •➤ पान २ वर

> शेतात आल्यावर दमदाटी व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जातात. राब भरण्याची वेळ आली आहे. सध्याच्या दिवसात भात शेती करण्यासाठी राब जाळला जातो, मात्र इथे आल्यावर जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जातात. त्यामुळे वडील शेत जमिनीकडे येत नाही. साजिद हसन मुश्रीफ यांचे नावे आजूबाजूची जमीन असून शेतकऱ्यांना शेतीमध्ये जाण्याची बंदी घातली गेली आहे.
>
> – रोशन हाबळे, शेतकरी

> आमची सातबारा उतारा यावरील लागवडीखाली नसलेली जमीन विकण्यात आली होती. मात्र त्यांनी सर्व जमीन हडपली. त्या जमिनीत झोपडी असून ही जागा विकली नाही. त्यामुळे मी इथून झोपडी काढणार नाही. त्यांनी झोपडी मोडण्याचा प्रयत्न केला. मंत्री हसीन मुश्रीफ या अन्यायाला जबाबदार असल्याचे सांगितले जात आहे. शेतकऱ्यांचा रस्त्याची अडवणूक केली जात आहे.
>
> – जिजाबाई राणे, शेतकरी

## तीन बालविवाह रोखण्यात पोलिसांना यश

**। रायगड । प्रतिनिधी ।**

बालविवाह या प्रथेला आळा घालण्यासाठी रोहा पोलिसांनी मोठी कारवाई केली. वेगवेगळ्या तीन घटनांमध्ये पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत बालविवाह रोखण्यात यश मिळवले आहे.

यापैकी एका गंभीर प्रकरणात गुन्हा दाखल करून न्यायालयात दोषारोपपत्रही सादर करण्यात आले आहे.

पहिल्या घटनेत गायचोळे आदिवासीवाडी येथे १६ मार्च रोजी १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विवाह त्याच वाडीतील २० वर्षीय तरुणासोबत होणार होता. यासंदर्भात पोलीस मंगल टेमकर यांना लग्नपत्रिकेसह गोपनीय माहिती मिळाली. त्यांनी तात्काळ प्रभारी अधिकारी मारुती पाटील यांना कळवले.

पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने घटनास्थळी धाव घेत संबंधित कुटुंबीयांना ताब्यात घेऊन बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अंतर्गत कायद्याची माहिती देत त्यांचे समुपदेशन केले. दुसऱ्या प्रकरणात, मे २०२६ मध्ये गायचोळे आदिवासीवाडीतील १७ वर्षीय मुलीचा विवाह कोलाड येथील २० वर्षीय तरुणासोबत ठरवण्यात आला होता. बीट अंमलदार नरेश मोरे यांनी प्रभारी अधिकारी सुयशकुमार सिंह यांना माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस •➤ पान २ वर

# एसटीचा तोटा तब्बल ५९१ कोटींचा

## • ठोस उपाययोजना करण्याचे परिवहन मंत्र्यांचे महामंडळाला निर्देश

**। रायगड । प्रतिनिधी ।**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आर्थिक कामगिरीबाबत परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट भूमिका मांडत तोटा कमी करण्यासाठी सर्वंकष उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत. ते एसटी महामंडळाच्या मुख्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत बोलत होते. या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर व सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.



या आर्थिक वर्षात एसटीचे एकूण चलनीय उत्पन्न ११,४७५ कोटी रुपये इतके नोंदविण्यात आले, तर खर्च १२,०६६ कोटी रुपये झाला. परिणामी महामंडळाला तब्बल ५९१ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला. दैनंदिन सरासरी उत्पन्न ३१ कोटी ४० लाख रुपये असताना, खर्च ३३ कोटी रुपये इतका झाला असून दररोज सुमारे १ कोटी ६० लाख रुपयांचा तोटा होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. राज्यातील एकूण ३१ विभागांपैकी केवळ ८ विभाग नफ्यात असून, उर्वरित २३ विभाग तोट्यात आहेत.

मागील आर्थिक वर्षात जालना, परभणी, बुलढाणा, भंडारा, गडचिरोली, अकोला, धुळे आणि वर्धा हे ८ विभाग नफ्यात होते. मात्र उर्वरित २३ विभागापैकी नाशिक, कोल्हापूर, नागपूर, रत्नागिरी, सातारा आणि ठाणे या मोठ्या विभागांचा वाढता तोटा गंभीर चिंतेचा विषय असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.येत्या आर्थिक वर्षात वाहतुकीचे सुयोग्य नियोजन करून उपलब्ध बसेस आणि मनुष्यबळाचा अधिकाधिक कार्यक्षम वापर करणे अत्यावश्यक आहे. उर्वरित दीड ते दोन कोटी रुपयांचा दैनंदिन तोटा भरून काढणे हे आपले मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे,असे ते म्हणाले.

तोट्यातील विभागांची सखोल चौकशी करून त्यामागील कारणांची मिमांसा करावी व त्यावर ठोस उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले. तसेच सातत्याने तोट्यात असलेल्या मोठ्या विभागांमध्ये सक्षम आणि कार्यक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नागपूरसारख्या मोठ्या विभागात गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने तोटा होत असून तेथे अकार्यकारी विभाग नियंत्रक नेमण्यात आल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. ज्या अधिकाऱ्यांकडे आर्थिक आणि वैधानिक अधिकार नाहीत, ते प्रशासनावर प्रभावी नियंत्रण ठेवू शकत नाहीत. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांना पर्यायी पदस्थापना देऊन सक्षम नेतृत्व देणे आवश्यक आहे, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.

महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रशासनिक शिस्त, संसाधनांचा प्रभावी वापर आणि जबाबदारी निश्चिती या तत्त्वांवर भर देत लवकरच व्यापक सुधारणा आराखडा राबविण्यात येणार असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने राज्यभरात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांमध्ये विचारप्रवर्तक लेखनाची आवड निर्माण करणे तसेच डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांसाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या कार्याचा व्यापक आवाका लक्षात घेता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य या



विषयावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धा दोन गटांत होणार असून पहिल्या गटात शासकीय व खाजगी आयटीआय तसेच आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. या गटासाठी निबंधाची शब्दमर्यादा ५०० ते ८०० अशी आहे.

दुसरा गट खुला असून राज्यातील सर्व महिला व पुरुष सहभागी होऊ शकतात. या गटासाठी ८०० ते १२०० शब्दांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दोन्ही गटांसाठी निबंध केवळ मराठी भाषेत सादर करणे बंधनकारक आहे. स्पर्धेचा कालावधी १४ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ असा आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी ९१५२२३०१९३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.तसेच नोंदणीसाठी क्यूआर कोडची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून नोंदणी केल्यानंतर स्पर्धकांना त्याची पोचही दिली जाणार आहे.

# वैद्यकीय महाविद्यालयात सामाजिक उपक्रम

**। रायगड । प्रतिनिधी ।**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग येथे विविध सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्टुडंट कौन्सिल कमिटीच्या वतीने हे उपक्रम राबविण्यात आले.

या उपक्रमांतर्गत १० एप्रिल रोजी माणी व भुते येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये आरोग्य जनजागृती अभियान राबविण्यात आले.

यामध्ये विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता, मासिक पाळीतील आरोग्य व्यवस्थापन, ॲनिमिया निर्मूलन तसेच हिपॅटायटीस बी लसीकरणाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे हा या मोहिमेचा उद्देश होता.



११ एप्रिल रोजी महात्मा फुले जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) थळ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर पार पडले.

आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्राध्यापक डॉ. सुधाकर बांटेवाड, डॉ. विशाल उबाले, आरसीएफचे रमेश कवळे तसेच रक्तपेढीचे डॉ. गोसावी यांची उपस्थिती होती. विद्यार्थी, कर्मचारी व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले. सर्व रक्तदात्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. १३ एप्रिल रोजी १८ तासांच्या अध्ययन उपक्रम ांतर्गत विद्यार्थ्यांसाठी ध्यान सत्रांचे आयोजन करण्यात आले. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. पूर्वा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

# अग्निशमन सेवा दिन साजरा

**। उरण । प्रतिनिधी ।**

ओएनजीसी उरण संयंत्र येथे अग्निशमन सेवा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे एस.एन. अहमद- जीजीएम प्लांट मॅनेजर, ओएनजीसी उरण प्लांट, यांनी शूर शहीदांचे स्मरण करून त्यांना आदरांजली वाहिली. त्यानंतर १४ ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सप्ताहाची औपचारिक घोषणा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. या वर्षासाठी ठरवलेली थीम स्पष्ट करण्यात आली. यानंतर कार्यक्रमाला उपस्थित सर्वांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शपथ देण्यात आली.

कार्यक्रमाचा मुख्य उद्देश अग्निसुरक्षेचे महत्त्व वाढवणे आणि आपत्कालीन परिस्थितीत अग्निसुरक्षेबद्दल जागरूकता पसरवणे हा होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी शहिदांना श्रद्धांजली अर्पण करून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. यावेळी राजेश कुमार आर्य, लोकेश चंद डेप्युटी कमांडंट फायर, एचआर ऑपरेशन, मेंटेनन्स आणि ओएनजीसीचे इतर अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी शहीद इराणा नायक वाटिकेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे एस.एन. अहमद जीजीएम प्लांट मॅनेजर, राजेश कुमार आर्य कमांडंट सी आय एस एफ युनिट ओएनजीसी मुंबई यांच्या उपस्थितीत झाला.



# तळा तालुक्यामध्ये महामानवांचा जयंती उत्सव साजरा

**। तळे । प्रतिनिधी ।**

भारतीय बौद्ध महासभा तालुका तळा तळा, तालुका बौद्धजन सेवा संस्था (रजि) रायगड, वंचित बहुजन आघाडी तालुका तळा यांच्या संयुक्त विद्यमाने तथागत भगवान गौतम बुद्ध, चक्रवर्ती सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव तळा तालुका बौद्धजन सेवा संस्थेचे कार्याध्यक्ष धर्मा तुकाराम लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत तळा तालुका डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक तळा येथे संपन्न झाला.

प्रथमतः संविधानाचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला समता सैनिक दलाचे डिव्हिजनल ऑफिसर अंकुश आनंद माळी यांचे समवेत समता सैनिक दलाचे जवान आणि उपस्थित भीम अनुयायी यांनी मानवंदना दिली. तदनंतर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिमराज जाधव यांनी केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे तळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, सभापती नथुराम मुकण, गट विकास अधिकारी महादेव शिंदे, तळा तहसिलदार स्वाती पाटील, तलाठी अंकिता झाडे, ॲड उत्तम जाधव, अंधश्रद्धा निर्मूलन समिती सचिव महेंद्र पाटेकर, जिल्हा समिती सामाजिक जाणीव व जागृती विभाग कार्यवाह प्रा. डॉ. दत्ता कुंटेवाड, तळा शाखा कार्याध्यक्ष सुनील बैकर, उपाध्यक्ष भिम राज जाधव, बुद्धरत्न भवरे, सचिन भाटे, स्वप्नील वरंडे, मुजफ्फर शेख, संपादक डी. टी आंबेगावे, पांडुरंग गायकवाड, अक्षता काते, साक्षी गायकवाड, रमेश हिलम इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## श्री स्वामी समर्थ पालखी दर्शन सोहळा

**रेवदंडा** : चौल शितळादेवी येथे श्री स्वामी समर्थ पालखी दर्शन सोहळयांस हजारों भक्तानी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. चौल येथे सायकांळी ४.०० वाजता श्री स्वामी समर्थ पालखी परिक्रमाचे आगमन झाले. या पालखी सोहळयाचे सायकांळी ५ ते ७.३० पर्यंत श्री स्वामी समर्थ पालखीचे अष्टविनायक मंदिर सोंडेपार ते शितळादवी मंदिर मिरवणूक सोहळा उत्साहात संपन्न झाला. रात्री ७.३० वाजता आरती व पादुका दर्शन सोहळा शितळादेवी मंदिर मुक्कामी ठेवण्यात आला होता यावेळी पंचक्रोशीतील भाविकांनी पालखी दर्शनाचा व रात्री ८ ते १० महाप्रसादाचा लाभ घेतला. रात्री ८.०० वाजता भजनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ५ एप्रिल रोजी सकाळी साडेपाच वाजता श्री स्वामी समर्थ पादुकांचा अभिषेक सोहळा व पालखीचे अलिबागकडे प्रस्थान झाले.

पान १ वरून

## १०५ कोटींची लॉटरी

यामध्ये रायगड जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आलेल्या निधीमध्ये २१ कोटी २६ लाख ९७ हजार ५०७ रुपयांचा अबंधित आणि ३१ कोटी ४५ लाख ८३ हजार ४८३ रुपयांचा बंधित निधीचा समावेश आहे. पंचायत समिती स्तरावर केल्या जाणाऱ्या विकास कामांसाठी २१ कोटी २६ लाख ९७ हजार ५०७ अबंधित आणि३१ कोटी ४५ लाख ८३ हजार ४८३ रुपयांचा बंधित निधीचा समावेश आहे.

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी या निधीचा पारदर्शक व परिणामकारक वापर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर व उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी या निधीमुळे ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांमध्ये मोठी सुधारणा होईल आणि विकासकामांना वेग मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. आलेल्या १०५ कोटी ४५ लाखांच्या निधीमधून सत्ताधाऱ्यांना किती आणि विरोधात असणाऱ्या सदस्यांना किती निधी मिळतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## झोपडीधारकांना न्याय मिळवून देणार

बुधवारी (दि.१५) पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन, त्यांचा प्रश्न व त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. यावेळी अरविंद म्हात्रे यांनी सदर झोपडीधारकांना लवकरात लवकर न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी नगरसेवक हरेश केणी, गटनेते केतन म्हात्रे, नगरसेवकप्रकाश म्हात्रे, नगरसेवक राम पाटील, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## पालीत डंपरचा पुन्हा धुमाकूळ

मुजोर डंपर चालकाने पळून जाण्याचा प्रयत्न केला होता.

तसेच जानेवारी महिन्यात ग. बा. वडेर हायस्कूलजवळ एका डंपरच्या फाळक्याची कडी तुटून ग्रामविकास अधिकारी सचिन केंद्रे गंभीर जखमी झाले होते. दीड-दोन महिन्यांच्या अंतराने लागोपाठ घडणाऱ्या या घटनांमुळे प्रशासनाने यातून कोणताही धडा घेतला नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे पालीतील नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात प्रचंड असंतोष आहे.

या ओव्हरलोड डंपर वाहतुकीमुळे शाळकरी विद्यार्थी, पालक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. अवजड वाहतूक थांबावी व निर्बंध लागावे यासाठी नगरपंचायतीला सह्यांचे निवेदन दिले होते, मात्र कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. प्रशासनाने ही ओव्हरलोड वाहतूक तातडीने बंद करावी, अन्यथा सामान्य पालीकर रस्त्यावर उतरतील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

**नगरपंचायतीचा ठराव धूळखात?**

नागरिकांच्या तक्रारीनंतर पाली नगरपंचायतीने २६ फेब्रुवारी रोजी ठराव क्र. १९७ मंजूर केला होता. यानुसार शहरातून सकाळी ७ ते रात्री ८ या वेळेत अवजड वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात २७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन कार्यवाहीची मागणी करण्यात आली होती. मात्र, अद्याप जिल्हाधिकाऱ्यांकडून कोणत्याही सूचना प्राप्त न झाल्याने किंवा नगरपंचायतीने अंमलबजावणी न केल्याने हा ठराव केवळ कागदावरच राहिला असल्याचे श्रीकांत ठोंबरे यांनी सांगितले.

## पेट्रोल -डिझेल महागणार

पश्चिम आशियातील तणाव आणि पुरवठा साखळीतील अडचणींमुळे तेलाच्या किमती १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेल्या आहेत, ज्याचा थेट परिणाम भारतासारख्या आयातदार देशांवर होत आहे. सध्या देशातील अनेक शहरांमध्ये पेट्रोल-डिझेलचे दर स्थिर असले तरी तेल कंपन्यांना मोठ्या प्रमाणावर तोटा सहन करावा लागत आहे. सरकारने ग्राहकांना दिलासा देण्यासाठी काही कर कपात केली असली, तरी कंपन्यांवरील आर्थिक ताण कायम आहे.

उद्योग क्षेत्रातील माहितीनुसार, तेल कंपन्यांना दररोज हजारो कोटी रुपयांचा फटका बसत असून, हा ताण दीर्घकाळ सहन करणे कठीण होत चालले आहे. त्यामुळे दरवाढ टाळणे सरकार आणि कंपन्यांसाठी आव्हानात्मक बनले आहे.जर आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाचे दर असेच वाढत राहिले, तर पेट्रोल-डिझेलच्या दरात मोठी वाढ अपरिहार्य ठरू शकते. याचा थेट परिणाम वाहतूक खर्चावर होऊन भाजीपाला, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तू महाग होण्याची शक्यता आहे.

तज्ज्ञांच्या मते, आगामी काही आठवड्यांत सरकार कर कपात किंवा इतर उपाययोजना करते का, यावर इंधन दरांचा पुढील कल ठरणार आहे. अन्यथा सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## विशेष मोहिमेचा विद्यार्थ्यांना मिळणार आधार

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने सामाजिक समता सप्ताह कार्यक्रम अंतर्गत विशेष मोहिमेचे आयोजन सुरु करण्यात आले आहे. १४ एप्रिलपासून ही मोहिम सुरु केली असून २० मार्चपर्यंत ही मोहिम असणार आहे. जात वैधता प्रमाणपत्रापासून विद्यार्थी वंचित राहू नये यासाठी ही मोहिम हाती घेण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र मिळविले आहे, त्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्वरित अर्ज सादर करण्यात यावेत. ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहे. मात्र त्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळाले नाही, अशा विद्यार्थ्यांनी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यालयात हजर राहून त्रुटींची पूर्तता करावी असे आवाहन चाचकर यांनी केले आहे.या मोहिमेतून जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्याचा आधार मिळणार आहे.

## मंत्री पुत्राची दबंगगिरी; हवालदिल शेतकरी

होते.शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या किसान क्रांती संघटनेकडून शेतकरी परशुराम हाबळे यांच्या उपस्थितीत न्याय मिळवून देण्याची मागणी तहसीलदार यांच्याकडे करण्यात आली होती. हाबळे यांच्या मालकीच्या शेतीमध्ये कुंपण घालण्यासाठी खोदकाम करण्यात येऊ लागले. कोणीतरी खोदकाम करीत आहे, हे समजल्यावर हाबळे हे आपल्या शेतीकडे गेले असताना तेथे असलेल्या व्यक्तींनी परशुराम हाबळे यांना धमकावले आणि पुन्हा इकडे यायचे नाही असे सुनावले. याबाबत शेतकरी पोलीस ठाण्यात पोहचले असता कोणीही दखल घेत नव्हते.

अखेर शेतकऱ्यांनी माध्यमांना ही बाब सांगितल्यावर सदर जमीन ही राज्याचे मंत्री हसन मुश्रीफ यांच्या मुलाच्या नावे असल्याचे समजले. याच मंत्री महोदयांची मानकिवली येथे देखील जमीन असून मंत्र्याच्या सुपुत्र असल्याने पोलीस आणि महसूल प्रशासन शेतकऱ्यांच्या अन्यायाला न्याय देऊ शकत नाहीत. अधिकारी हतबल असल्याने शेतकऱ्याच्या पाठीशी किसान क्रांती संघटना उतरली असून मंत्र्यांचा मुलगा असला तरी आम्ही शेतकऱ्याला न्याय मिळवून देणार, असा निर्धार किसान क्रांती संघटनेने केला आहे.शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन किसान क्रांती संघटनेने पाहणी केली असता शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात जमीन देखील मंत्र्यांच्या सुपुत्राच्या चेल्यांनी बळकावली असल्याचे दिसून आले आहे. त्याचवेळी तेथे काम पाहणारे मंत्र्याचे सुपुत्राचे चेले हे आमचे कोणीही काहीही करू शकत नाही, आमच्या पाठीशी कोण आहे हे तुम्हाला माहिती नाही, पत्रकार पण काही करू शकत नाहीत अशा बढाया मारीत होते.

जमिनीवर केले जात असलेल्या अतिक्रमण प्रकरणी कळंब येथील आऊट पोस्टमध्ये शेतकरी रोशन परशुराम हाबळे पोहचले असता त्यांना देखील पोलिसांनी थारा दिला नाही.त्यानंतर कळंब येथे शासनाचे छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियान सुरू असताना संबंधित शेतकरी तेथे पोहचले. त्यावेळी तहसीलदार जाधव यांनी मंडळ अधिकारी संतोष जांभळे यांना तात्काळ पंचनामा करावा आणि अहवाल सादर करावा असे सूचित केले. मात्र आठ दिवसात मंडळ अधिकारी देखील त्या ठिकाणी पंचनामा करण्यासाठी पोहचले नाहीत.

## तीन बालविवाह रोखण्यात पोलिसांना यश

पथक, ग्रामसेवक व स्थानिक नागरिकांच्या मदतीने संबंधितांना समज देण्यात आली.तर, भुवनेश्वर आदिवासीवाडी येथे २८ जून २०२५ रोजी बालविवाह असल्याची माहिती मिळाल्यानंतर कुटुंबीयांना समज देण्यात आली होती, परंतु त्यानंतरही विवाहाची तयारी सुरूच होती.

यादरम्यान हळदी समारंभात पोलिसांनी छापा टाकला असता १६ वर्षीय मुलीशी संबंधित तरुणाने संबंध ठेवून तिला गर्भवती केल्याचे उघड झाले. याप्रकरणी संबंधित मुलगा व दोन्ही कुटुंबीयांविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून, दोषारोपपत्रदेखील न्यायालयात सादर केले आहे.

## चालकास मारहाण करणाऱ्यांना शिक्षा

त्यामुळे फिर्यादी दिपक खंडागळे यांनी मोटारसायकल बाजूस घेण्यास सांगितल्याचा राग आरोपी आखिब आबिद इलामी व आदिल सलाम पानसरे यांना राग येवून त्यांनी चालक यांस अरमान अब्दुल रशिद मन्सूरी याने एसटी चालक दिपक खंडागळे यांस त्यांच्या सीटवरून खाली खेचून त्याचे शर्टची बटने तोडून आतील बनियान फाडून मारहाण केली. आरोपीविरूध्द नागोठणे पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल केला. सदर खटल्याची सुनावणी अति. सत्र न्यायालय, माणगांव-रायगड येथे झाली. सदर खटल्यामध्ये अति. शासकिय अभियोक्ता जितेंद्र डी. म्हात्रे यांनी सरकार पक्षाच्या वतीने काम पाहिले. व प्रभावी युक्तिवाद करून उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे महत्वाचे न्यायनिर्णय दाखल केले. सदर केसमधील फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व तपासी अंमलदार यांची साक्ष महत्वाची ठरली. केसमधील आखिब अबिद इलामी, आदिल सलाम पानसरे व अरमान अब्दुल रसिद मन्सूरी यांस अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश मुकेश के. पाटील यांनी दोषी ठरवून आरोपीस भा.द.वि.क. ३५३ अन्वये २ वर्ष सक्तमजुरी व रू. ७००० रुपये दंड, भा.द.वि.क. ३३२ अन्वये ६ महिने सक्तमजूरी व ७००० रुपये दंड तसेच भा.द.वि.क. ३२३ अन्वये ६ महिने सक्तमजूरी व १००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली.



# सिडको महामंडळामध्ये डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

सिडको बी. सी. एम्प्लॉईज असोसिएशन व सिडको एम्लॉईज युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सिडको भवन येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ वी जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली.

या प्रसंगी विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, डॉ. राजा दयानिधी, गणेश देशमुख, सुरेश मेंगडे, सुभाष पाटील, नितीन कांबळे, प्रमोद पाटील, अध्यक्ष, सिडको प्रकल्पग्रस्त कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन आणि प्रमुख वक्ते ज्ञानेश महाराव यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

या प्रसंगी देशाचे संविधान आणि आजची परिस्थितीफ या विषयावर बोलताना प्रमुख वक्ते ज्ञानेश महाराव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे परिस्थिती बदलण्याची जिद्द असल्याने त्यांनी संविधान निर्मितीचे अलौकिक काम केल्याचे सांगून संविधानातील मूल्यांचा अंगीकार करणे हे नागरिकांचे कर्तव्य असल्याचे प्रतिपादन केले.

विजय सिंघल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर निर्मित भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्कृष्ट लिखित संविधान असल्याचे मत व्यक्त केले. तसेच डॉ. आंबेडकरांच्या संघर्ष आणि जिद्द या गुणांचा अवलंब करून आपणही आपल्या कामाद्वारे आपला ठसा उमटवावा, असे आवाहन केले. गणेश देशमुख यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाद्वारे दिलेल्या समतेच्या संदेशाचे पालन दैनंदिन जीवनामध्ये करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात सिडको आर्टिस्ट कम्बाईनच्या गायकांनी सादर केलेल्या भीमगीतांनी झाली. तद्नंतर मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

## संत गोरा कुंभार महाराज जयंती साजरी

**रेवदंडा** : रेवदंडा गावात १३व्या शतकातील कर्मयोगी संत गोरा कुंभार यांची जयंती बुधवारी, १५ एप्रिल रोजी मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने साजरी झाली.

सकाळी विठ्ठलमंदिरात झालेल्या कीर्तन-भजनाने परिसर भक्तीमय झाला. दुपारची महाप्रसाद सोहळ्यात पंचक्रोशीतील शेकडो गावकऱ्यांनी सहभाग घेतला.

रेवदंड्यातील कुंभार समाजाने बांधलेले संत गोरा कुंभार समाजमंदिर हा उत्सवाचा प्रमुख केंद्रबिंदू ठरला. या मंदिरात रोज सकाळ-संध्याकाळ विठ्ठलभक्तीने पूजा-अर्चना होते. जयंतीला मंदिर सजवून अभंगकीर्तन झाले.

## निवडक



### भुयारी गटारे अपघाताला निमंत्रण

**पाताळगंगा** : खालापूर तालुक्यातील निगडोली गावातील घरातून निघणारे सांड पाण्यासाठी भुयारी गटाराचे काम सहा वर्षांपूर्वी पुर्ण झाले. मात्र, वाहनांची सातत्याने वर्दळ असल्यामुळे या ठिकाणी बसविण्यात आलेली लोखंडी जाळीच्या झाकणांची दुरवस्था निर्माण झाल्यामुळे अपघताला निमंत्रण ठरत आहे. निगडोली येथून खोपोलीडे जाणारा जवळचा मार्ग असल्यामुळे परिसरातील शेकडो नागरिक याच मार्गाचा अवलंब करतात. परिणामी या रस्त्यावर बांधण्यात आलेले आरसीसी भुयारी गटार आता अपघातांचे केंद्र बिंदु बनत आहे. तसेच, अनेक ठिकाणी लोखंडी जाळी बसविण्यात आली असून, वहानांच्या वर्दळीमुळे त्यांची दुरवस्था झाली आहे. येथिल काही तरुणांनी या ठिकाणी खराब झालेल्या जाळीत झाडाच्या फांद्या टाकल्या आहेत. त्यामुळे वाहन चालकांना तातडिने निदर्शनास येताच अपघातावर नियंत्रण करणे सोपे जात आहे. त्यामुळे या गटारावरील तुटलेल्या जाळीच्या दुरूस्तीचे काम लवकरात लवकर करावे, अशी मागणी ग्रामस्थ आणी वाहनचालक करीत आहेत.

### रायगडमध्ये 'ओव्हरलोड' खेळ सुरूच

**उरण** : काही दिवसांपूर्वी कल्याण-मुरबाड मार्गावर झालेल्या भीषण अपघातात ११ निष्पाप जीवांचा बळी गेला. तरीही रायगड जिल्ह्यातील रिक्षा आणि टॅक्सीचालकांना याचा काहीच धडा मिळालेला दिसत नाही. उलट, आजही क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरून 'मृत्यूचा खेळ' सुरूच असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. रिक्षामध्ये केवळ ३ ते ४ आणि टॅक्सीमध्ये ६ ते ७ प्रवाशांची अधिकृत क्षमता असताना, जास्तीच्या पैशांच्या हव्यासापोटी चालकांकडून सर्रास नियमांची पायमल्ली केली जात आहे. लहान मुले, महिला आणि वयोवृद्ध यांच्या जीवाशी खेळ करून त्यांना अक्षरशः कोंबून नेले जात असल्याचे संतापजनक चित्र उघड झाले आहे. याहून गंभीर बाब म्हणजे, प्रवासी वर्गात तीव्र नाराजी असतानाही पोलीस आणि वाहतूक यंत्रणा मात्र डोळेझाक करत असल्याची चर्चा रंगली आहे. उरण, पनवेल, नवी मुंबई परिसरात यापूर्वीही अशाच प्रकारच्या दुर्घटना घडून जीवितहानी झाली आहे. तरीही ना चालकांवर लगाम, ना ठोस कारवाई हीच प्रशासनाची 'धोरणशून्यता' असल्याचा आरोप होत आहे. उरण, पनवेल व इतर मार्गावर तर 'ओव्हरलोड' रिक्षा-टॅक्सींचा अक्षरशः सुळसुळाट झाला असून, कधीही मोठी दुर्घटना घडू शकते अशी भीती व्यक्त होत आहे.

### उरणकरांना वाहतूक कोंडीचा ताप

**चिरनेर** : खोपटे-कोप्रोली रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम कासव गतीने सुरू असून जुन्या खोपटे पुलाचे काम देखील रखडत सुरू आहे. त्यातच बेशिस्त वाहन चालकांकडे वाहतूक पोलिसांचे होत असलेले दुर्लक्ष यामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत या मार्गावर वाहनांच्या ३ किलोमीटरपर्यंत रांगा लागत आहेत. ७ कोटी रुपये खर्चाच्या खोपटे-कोप्रोली ९०० मीटर लांबीच्या रस्त्याचे काम ठेकेदारांकडून अत्यंत संथ गतीने सुरू आहे. त्यामध्ये आता जुन्या खोपटे पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. जुन्या खोपटे पुलाच्या दुरुस्तीच्या कामामुळे नव्याने उभारण्यात आलेल्या एकेरी पुलावरून दुहेरी वाहतूक सुरू झाली आहे. वाढत्या कंटेनर यार्डमुळे उरण तालुक्याच्या ग्रामीण भागाशी जोडणाऱ्या या मार्गावरून अवजड कंटेनर मालाची ही मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत आहे. या वाढत्या अवजड वाहतुकीचा ताण आणि ग्रामीण भागातील हलक्या वाहनांच्या वाढत्या वाहतुकीमुळे या मार्गावर वाहतूक कोडींची समस्या नित्याचीच झाली आहे.



### ताबा सुटल्याने गाडी घुसली घरात


**महाड** : तालुक्यातील शिरगाव गावाजवळ दुपारच्या सुमारास एका कार चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने रस्त्यालगत असलेल्या एका घराच्या पत्र्याच्या शेडला जोरदार धडक दिली. या अपघातात शेडमध्ये उभ्या असलेल्या कारसह दोन दुचाकीसह धडक देणाऱ्या कारचे नुकसान झाले आहे. तसेच, शेडचे देखील मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही, परंतु कारचालकाला किरकोळ दुखापत झाली आहे. कारचालक हा अतिवेगाने कार हाकल्यामुळे हा अपघात झाल्याचे घटनास्थळी बोलले जात होते. अपघाताची माहिती मिळताच महाड पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

# उरणमधील समुद्रकिनारे मृत्यूचा सापळा

## पर्यटकांच्या जीवाशी खेळ सुरूच; प्रशासनाच्या बेजबाबदारपणाचा पर्दाफाश

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील समुद्रकिनारे हे आता पर्यटनस्थळ कमी आणि 'मृत्यूचा सापळा' अधिक बनत चालल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. सोमवारी (दि.१३) सायंकाळी घडलेल्या घटनेत पाच पर्यटक समुद्राच्या भरतीत अडकून मृत्यूच्या दारात पोहोचले होते; मात्र, सागर सुरक्षा रक्षकांच्या प्रसांगवधानाने त्यांचे प्राण बचावले. या थरारक घटनेमुळे प्रशासनाच्या बेजबाबदारपणाचा पुन्हा एकदा पर्दाफाश झाला आहे.



पिरवाडी समुद्रकिनाऱ्यासह नागाव किनाऱ्यावर दिवसेंदिवस पर्यटकांची गर्दी वाढत आहे. परंतु, या ठिकाणी सुरक्षेच्या नावाने मात्र शून्य व्यवस्था असल्याचे संतापजनक चित्र आहे. तसेच, धोकादायक भागांची कोणतीही सूचना नाही, इशारे देणारे फलक नाहीत, टेहाळणी चौक्या नाहीत. त्यामुळे 'जा आणि जीव धोक्यात घाला', असा मोकळा परवाना प्रशासनाने दिल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे पिरवाडी परिसरात पीर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसह मोठ्या प्रमाणात पर्यटक समुद्रात उतरत असतात. ओहोटीच्या वेळी पुढे गेलेले हेच पर्यटक भरती सुरू होताच चारही बाजूंनी पाण्यात अडकतात. अशा घटना वारंवार घडत असतानाही प्रशासनाने डोळ्यावर पट्टी बांधल्यासारखी भूमिका घेतली आहे.

सोमवारी घडलेल्या घटनेत पाच पर्यटक भरतीच्या पाण्यात अडकले होते. सागर सुरक्षा रक्षकांनी क्षणाचाही विलंब न लावता अत्यंत धाडसाने सर्वांना सुखरूप बाहेर काढले. त्यांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली; मात्र, प्रत्येक वेळी नशिब साथ देईलच याची खात्री कोण देणार? असा सवाल स्थानिकांसह पर्यटकांमधून विचारला जात आहे. याहून धक्कादायक बाब म्हणजे, पिरवाडी ते नागाव समुद्रकिनाऱ्यावर एकही टेहाळणी चौकी नाही. सुरक्षा रक्षकांकडे आवश्यक साधनसामग्री नाही. तरीही ते स्वतःचा जीव धोक्यात घालून पर्यटकांचे प्राण वाचवत आहेत. प्रशासन मात्र वातानुकुलीत कार्यालयात बसून कागदी घोडे नाचवत असल्याची तीव्र टीका स्थानिकांकडून होत आहे. तसेच, दरवर्षी अशा घटनांमध्ये वाढ होत असतानाही ग्रामपंचायत, तहसील प्रशासन, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि संबंधित विभागांनी एकत्र येऊन ठोस उपाययोजना केल्याचे दिसत नाही. त्यामुळे 'आता तरी जागे व्हा', असा संतप्त इशारा नागरिकांनी प्रशासनाला दिला आहे. तसेच, येथील किनाऱ्यांवर तात्काळ धोक्याचे फलक उभारणे, टेहाळणी चौक्या सुरू करणे आणि सागरी सुरक्षा रक्षकांना अत्याधुनिक साधनसामग्री देणे गरजेचे आहे. अन्यथा, एखादी मोठी जीवीतहानी व्हायला वेळ लागणार नाही.

> **"पिरवाडी समुद्रकिनारी वर्षभरात अशा प्रकारच्या अनेक घटना घडत आहेत. त्यामुळे लवकरच ग्रामपंचायतीच्या माध्यमातून योग्य ती खबरदारी घेऊन या ठिकाणी सुरक्षा फलक लावण्यात येतील.**
> **– सर्जेराव पाटील, गटविकास अधिकारी, उरण पंचायत समिती."**

### घटना घडल्यावरच प्रशासनाला जाग

पिरवाडी समुद्रकिनाऱ्यावर वारंवार घडणाऱ्या जीवघेण्या घटनांनंतर अखेर प्रशासनाला जाग आली आहे. वर्षभरात अनेक वेळा पर्यटक आणि नागरिक भरतीच्या पाण्यात अडकून जीव धोक्यात घालण्याच्या घटना घडत असतानाही संबंधित यंत्रणा मात्र बघ्याची भूमिका घेत होती. मात्र, आता वाढत्या टीकेनंतर आणि सलग घटनांनंतर प्रशासनाने हालचाल करण्याचे संकेत दिले आहेत. उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील यांनी, ग्रामपंचायतीमार्फत लवकरच योग्य ती खबरदारी घेत सुरक्षा फलक लावण्यात येतील, असे स्पष्ट केले आहे. मात्र, हा निर्णय उशिराने घेतल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये आहे. तसेच, आता तरी प्रशासनाने फक्त घोषणा न करता प्रत्यक्षात कृती करण्याची गरज आहे. अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाचीच राहील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## उलवे अतिक्रमणाच्या गर्तेत



**| उरण | प्रतिनिधी |**

उलवे शहर हे भविष्यात पंचतारांकित शहर म्हणून विकसित होणार आहे. परंतु, ते सध्या अतिक्रमणाच्या गर्तेत अडकले आहे. शहरात प्रवेश केल्यानंतर रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमणे झाली असून विविध प्रकारची दुकाने अनधिकृतपणे थाटली आहेत. तसेच, शहरात सार्वजनिक शौचालयाचा अभाव आहे, त्यामुळे स्थानिक जनतेला अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे. या सर्वांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते, त्यामुळे स्थानिक जनतेमध्ये नाराजी पसरत आहे. उलवे शहर अतिक्रमण मुक्त व्हावे, अशी अपेक्षा स्थानिक जनतेने व्यक्त केली आहे. शहरात जागतिक विमानतळ, रेल्वे, मेट्रो आणि जलमार्गाने मुंबईला जोडणारा अटळ सेतू आहे. परंतु, सध्याची अतिक्रमणाची समस्या दूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे उलवे मधील अनधिकृत बांधकामे, टपऱ्या हटवाव्यात, अशी मागणी स्थानिक जनतेने केली आहे.

## शहिद जवानांच्या शौर्याला सलाम..





● अग्निशमन सेवा दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातर्फे शहीद जवानांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. कर्तव्य बजावताना प्राणाची आहुती देणाऱ्या वीर अग्निशामकांचे स्मरण करण्यात आले. यावेळी अधिकारी व जवानांनी त्यांच्या शौर्याला सलाम केला. (छायाचित्रः राजेश डांगळे)

## गो मातेला वाचविण्यासाठी 'जनआक्रोश'

- **बजरंग दलाच्यावतीने मुरूड शहरात मोर्चा**
- **मोठ्या प्रमाणात तरूणांचा सहभाग**

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरुड तालुक्यात वाढत असलेली बेकायदेशीर गोहत्या आणि गोवंश तस्करी ही सर्वांसाठी चिंतेची आणि संतापजनक बाब ठरत आहे. श्रद्धेचे प्रतीक असलेल्या गोमातेचे रक्त आपल्याच मातीत सांडत आहे. त्यामुळे गोहत्येच्या वाढत्या घटनांविरोधात आणि प्रशासनाचे डोळे उघडण्यासाठी विश्व हिंदू परिषद अंतर्गत बजरंग दलाच्यावतीने मुरूड शहरात जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात तरूणांचा मोठा सहभाग होता. यावेळी मुरूड पोलीस ठाण्यामार्फत आरसीपी, दंगल नियंत्रण पथक व पोलीस पथकातील १५० पोलिसांसह ५ अधिकाऱ्यांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सकाळी कल्याणी हॉस्पीटल आझाद चौक येथुन या भव्य जनआक्रोश मोर्चाला सुरुवात करण्यात आली. त्यांनतर हा मोर्चा आझाद चौक येथून नगरपरिषद कार्यालय, गणेश आळी नाका, मारुती नाका, दरबार रोड, तहसीलदार कार्यालयापर्यंत काढण्यात आला. यावेळी विश्व हिंदू परिषद-बजरंग दल कार्यकर्त्यांनी मुरूड तहसीलदार आदेश डफळ यांच्याकडे गोवंश तस्करी आणि हत्येशी संबंधित मुख्यमंत्र्यांना देण्यासाठीचे निवेदन सादर केले.



●(छायाचित्रः गणेश चोडणेकर)

## संदीपची पोलीस सेवेत भरती



**| नेरळ | प्रतिनिधी |**

लहान वयात आई-वडीलांचे छत्र हरवलेला कर्जत तालुक्यातील आसल-भूतीवली गावातील संदीप मारुती कोंडे या तरुणाने जिद्दीच्या जोरावर पोलीस सेवेत भरती होण्यात यश मिळविले आहे. त्याचा नुकताच अलिबाग येथे जिल्हा क्रीडा संचालक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

संदीपचे वडील मारुती कोंडे आणि त्यांच्या पत्नी यांचे तो लहान असताना निधन झाले. त्यानंतर अगदी गरीब परिस्थितीत हलाखीचे जीवन जगत आणि प्रतिकृत परिस्थीवर मात करीत संदीपने प्रसंगी चालत जात शिक्षण पुर्ण केले. डोंगर कपारीमध्ये दररोज ये-जा असलेल्या संदीप कोंडे याने आपल्या मोठ्या भावाच्या पाठिंब्याने पोलीस भरतीसाठी प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्यांनतर एका अकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेऊन पोलीस भरतीचा अडथळा यशस्वीपणे पार केला. त्याचवेळी संदीप स्थानिक तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी देखील आघाडीवर असून अनेक तरुणांना प्रशिक्षण देत आहे.

## पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

**| कोलाड | प्रतिनिधी |**

कोलाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गौळवाडी येथील आदिवासी समाजातील एक अल्पवयीन मुलीला मोबाईल वापरण्याच्या कारणावरून तीची आई रागावली. त्यामुळे ती अल्पवयीन मुलगी रात्री घर सोडून निघून गेली होती. याबाबत तिच्या आईने कोलाड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर कोलाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भारत फारणे यांनी तत्परता दाखवून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नरेश पाटील, पोलीस हवालदार भास्कर पाटील, पोलीस हवालदार वसंत सिद यांचे पथक तयार करून या अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यास सुरूवात केली. या पथकाने सुतारवाडी हद्दीतील गुप्त बातमीदार व पोलीस मित्र यांच्याकडून माहिती घेऊन या अल्पवयीन मुलीचा शोध घेतला. ही मुलगी दणकी आदिवासी वाडी पाथर शेत येथील धरणाच्या जंगल भागात सापडली. त्यानंतर तिची चौकशी करून तिचे समुपदेशन करून तिला तिच्या आईच्या ताब्यात देण्यात आले. कोणतीही माहिती नसताना फक्त बातमीदारांमार्फत बातमी काढून या पथकाने काही तासांत जंगल भागात शोध घेऊन या अल्पवयीन मुलीचा तत्परतेने शोध घेतला आहे. त्यामुळे कोलाड पोलिसांच्या या कौतुकास्पद कामगिरी बद्दल त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## श्रीवर्धनमध्ये चोरांचे राज्य? राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक

- **तालुका पोलीस प्रशासनाच्या सुस्त कारभाराचा निषेध**
- **उपविभागीय पोलीस अधिकारी यांची घेतली भेट**

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे येथील नागरिक सुरक्षित आहेत का? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. शहरातील कायदा-सुव्यवस्थेच्या ढासळलेल्या परिस्थितीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कमालीचा आक्रमक झाला आहे.



यावेळी पक्षाचे उपनगराध्यक्ष आणि सर्व नगरसेवकांनी थेट उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना जळजळीत निवेदन सादर केले असून, पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

श्रीवर्धन शहरात एकामागून एक होणाऱ्या चोरीच्या सत्रांमुळे सामान्य जनतेत दहशतीचे वातावरण आहे. 'पोलीस नक्की करतात काय', असा सवाल विचारण्यात आला आहे. रात्रीची गस्त केवळ नावापुरतीच उरली असून, गुन्हेगारांना पोलिसांचा धाक उरला नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने पोलीस प्रशासनाच्या सुस्त कारभाराचा तीव्र शब्दात निषेध केला. यावेळी बोलताना राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, श्रीवर्धनकर सध्या भीतीच्या सावटाखाली जगत आहेत. घरातील मौल्यवान वस्तू सोडाच, जीवही सुरक्षित नसल्याची भावना लोकांमध्ये निर्माण झाली आहे. पोलीस प्रशासनाने केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कृती करून गुन्हेगारांना जेलची हवा दाखवावी, अन्यथा यापुढील उद्रेकास प्रशासन जबाबदार असेल. या निवेदनावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आता पोलीस प्रशासन यावर नेमकी काय पावले उचलते, याकडे संपूर्ण श्रीवर्धनचे लक्ष लागले आहे.

## अ‍ॅड. दत्ता पाटील लॉ कॉलेजमध्ये गौरव | न्यायाधीश कनिष्ठ स्तर परीक्षेत निवड

# अलिबागच्या सुपुत्राचा विशेष 'सन्मान'

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील वाघ्रण गावचे सुपुत्र आणि जे.एस.एम. कॉलेज तसेच अ‍ॅड. दत्ता पाटील लॉ कॉलेजचे माजी विद्यार्थी अ‍ॅड. सन्मान पाटील यांची प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी व दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर परीक्षेत निवड झाली आहे. या देदीप्यमान यशाबद्दल अ‍ॅड. दत्ता पाटील लॉ कॉलेजतर्फे सन्मान पाटील आणि त्यांच्या आई-वडीलांचा जेएसएमचे अध्यक्ष अ‍ॅड. गौतम पाटील यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला.



सन्मान पाटील यांनी अलिबाग येथे आपले शालेय व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर जे.एस.एम. कॉलेजमधून पदवी संपादन केली. त्यानंतर २०१७ मध्ये अ‍ॅड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ मधून त्यांनी एलएलबी पूर्ण केले. वडील अ‍ॅड. प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग जिल्हा न्यायालयात वकिली करत असतानाच त्यांनी लॉकडाऊनच्या काळात या परीक्षेत यश मिळवण्यासाठी जिद्दीने तयारी सुरू केली होती. सन्मान पाटील यांनी सांगितले की, न्यायाधीश पद हे समाजातील एक मानाचे पद आहे, ही भावना कायम मनात होती. ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी सातत्य आणि संयम अत्यंत आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षेच्या प्रवासात अपयश आले तरी मी हे करू शकतो हा आत्मविश्वास ठेवून अभ्यास सुरू ठेवला. आपल्या महाविद्यालयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना ते म्हणाले की, प्राध्यापकांच्या उत्तम मार्गदर्शनामुळे कायद्याच्या मूलभूत संकल्पना स्पष्ट झाल्या, ज्याचा फायदा परीक्षेत झाला. तसेच, महाविद्यालयात होणाऱ्या मूट कोर्ट स्पर्धांमध्ये सहभाग घेतल्याने वकिलीचा पाया भक्कम झाला. अलिबागमध्ये हे महाविद्यालय असल्यामुळे ग्रामीण भागातील तळागाळातील विद्यार्थ्यांना कायद्याचे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. विद्यार्थ्यांनी या परीक्षेकडे सकारात्मकतेने बघून तयारी करणे गरजेचे असून, या प्रवासात विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मार्गदर्शन करण्याची तयारीही त्यांनी दर्शवली.

या सोहळ्याप्रसंगी जनता शिक्षण मंडळाच्या उपाध्यक्ष डॉ. साक्षी पाटील, प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, उपप्राचार्य डॉ. प्रविण गायकवाड, लॉ कॉलेजच्या नॅक समन्वयक प्रा. निलम म्हात्रे आणि प्रा. डॉ. संदिप घाडगे यांनीही सन्मान पाटील यांचे अभिनंदन केले.

## वैद्यकीय उपकरणांचे उद्घाटन



**| महाड | प्रतिनिधी |**

ओलॉन इंडिया प्रा. लि. महाड यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत महाड येथील ग्रामीण रुग्णालयात अत्याधुनिक व जीवनावश्यक वैद्यकीय साधनसामुग्रीचा लोकार्पण सोहळा मंगळवारी (दि.१४) पार पडला. या कार्यक्रमात मंत्री भरत गोगावले आणि स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग ऑण्ड सप्लाय चेनचे सीनियर व्हाईस प्रेसिडेंट ख्रिस्तियानो कॅप्रिऑत्ती यांच्या हस्ते या वैद्यकीय साधनसामुग्रीचे लोकार्पण करण्यात आले. महाड ग्रामीण रुग्णालयात मोठ्याप्रमाणावर रुग्ण उपचाराकरिता दाखल होत असतात. परंतु, आधुनिक उपकरणांच्या अभावामुळे यापूर्वी अनेक गंभीर रुग्णांना पुढील उपचाराकरिता दुसरीकडे हलवावे लागत होते. त्यामुळे ओलॉन इंडियाने हा दूरगामी परिणाम करणारा निर्णय घेतला आहे.

## जखम हाताला, मलम...

आजार एकीकडे आणि उपाय भलतीकडे हा आपल्या राज्यकर्त्यांचा शिरस्ता आहे. दोन वर्षांपूर्वी मुंबईच्या लोकल डब्यातून खाली पडून दोघांना जीव गमवावा लागला. त्यावर ओरडा झाल्यावर लोकल गाड्यांना दरवाजे बसवू अशी घोषणा सरकारने केली. सरकारातल्या एकाही मंत्र्याने वा आमदाराने कधी लोकल ट्रेनने प्रवास केलेला नसणार. त्यामुळेच ते असले उपाय सुचवू शकतात. आता असे दरवाजे बंद होणारे डबे मुंबईत दाखल झाले आहेत. त्यांचा प्रयोग केल्यानंतर त्यातले तोटे समजतीलच. मुद्दा असा की, लोकलची गर्दी कमी कशी होईल याकडे लक्ष न देता असले भलतेच उपाय सुचवणे हा जनतेला मूर्ख बनवण्याचा किंवा समजण्याचा प्रकार आहे. याच रीतीने आता मुंबईतील रिक्षा व टॅक्सीवाल्यांना मराठी येते की नाही हे तपासले जाणार आहे. येत्या एक मेपासून याची अंमलबजावणी केली जाणार असून मराठी न आल्यास परवाने रद्द केले जाणार आहेत. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. इथे रिक्षावाले किंवा दुकानदार इत्यादींना मराठी आलेच पाहिजे हा आग्रह चुकीचा नाही. मात्र त्यासाठी कायदा वा नियम करून उपयोग होणार नाही. मराठीची प्रतिष्ठा वाढवणे, मराठी लोकांनीच कटाक्षाने मराठीतूनच बोलणे असे उपाय करावे लागतील. मुंबईत घराबाहेर पडले की अस्सल मराठी माणूस सवयीने हिंदी बोलू लागतो. समोरचा माणूस मराठी असला तरी हिंदी संभाषण चालू राहते. हे बदलायला हवे. दुसरे म्हणजे रिक्षावाल्यांना मराठी येत नसले तरी बहुसंख्य लोकांचे काम भागते. इतर प्रश्न अधिक महत्वाचे आहेत. जवळचे आहे म्हणून भाडे नाकारणे, पावसात किंवा गर्दीच्या वेळी जास्त भाडे घेणे, सुट्ट्या पैशांवरून अडवणूक करणे, मीटर फास्ट असणे, रिक्षा बेदरकारपणे चालवणे हे प्रश्न लोकांच्या अधिक जिव्हाळ्याचे आहेत. ग्रामीण भागात तर याहूनही अधिकच समस्या आहेत. तिथे मीटर ही भानगडच नाही. आपल्याला लुटले जात आहे हे कळत असूनही प्रवाशांचा नाईलाज असतो. त्याबाबत कोठेही तक्रार करण्याची सोय नसते व केले तरी तिला दाद मिळत नाही.

### मुरबाडच्या अपघाताचा धडा

कोकणामध्ये रेल्वे पोचली व तिने प्रवास सुखकर झाला. पण रेल्वे स्टेशनपासून आपापल्या गावांपर्यंत जाण्याचा प्रवास प्रचंड महाग झाला. माणगाव, खेड किंवा चिपळूण या ठिकाणांपर्यंत मुंबईहून माणसाला चार-पाच तासांमध्ये आणि शंभर-दोनशे रुपयांच्या तिकिटात जाता येते. पण पुढे आपल्या गावाला जाण्यासाठी एकट्या माणसाला पाचशे, हजार रुपये लागतात. या मार्गावर एसटीची बसेसची कोणतीही सोय उपलब्ध नसते. चिपळूणसारख्या मोठ्या एसटी स्थानकांमधूनही आता एसटीच्या गावोगावी जाणाऱ्या बसेस कमी झाल्या आहेत. त्यांना प्रवासी नसल्याचे कारण एसटीवाले देतात. पण वेळेवर आणि पुरेशा गाड्या नसणे हेच एसटी माघारण्याचे मोठे कारण आहे. एसटीने काळानुरुप मिनीबसेस घ्यायला हव्या होत्या. विशेषतः कोकणातल्या रस्त्यांवर त्या फारच उपयोगी पडल्या असत्या. पण ते झाले नाही. त्याचा परिणाम म्हणून आज गावातल्या लोकांना अधिक पैसे मोजून अत्यंत अडचणीच्या स्थितीत सहा आसनी रिक्षा किंवा जीपमधून प्रवास करावा लागतो. यांना टमटम किंवा डुक्कर अशी नावे आहेत. हे गाडी किंवा रिक्षावाले अधिक पैसे मिळवण्याच्या मोहापायी वाट्टेल तेवढे प्रवासी घेतात. इतके करूनही सगळ्यांना लवकर जायची घाई असल्याने जीवघेण्या वेगाने गाडी चालवतात. त्यातून मग अपघात होतात. परवा मुरबाडजवळ झालेला अपघात हे त्याचे ढळढळीत उदाहरण आहे. इको कारमध्ये पाच किंवा सहा जण बसत असताना त्यात अकरा जण कोंबण्यात आले होते. कल्याणहून मुरबाडला जायचे असेल तर एसटी बसेस नाहीत. लांब पल्ल्यांच्या गाड्यांमध्ये या प्रवाशांना घेतले जात नाही. परिणामी कामावर जाणाऱ्यांना रिक्षा किंवा खासगी मोटारींचा आसरा घ्यावा लागतो. या इको मोटारीमध्ये अकरा जण कशा स्थितीत बसले असतील याची कल्पनाही करता येणे कठीण आहे. ती कार सिमेंट मिक्सरवर जाऊन आदळली आणि अकरा जण जागीच ठार झाले. यामध्ये मुरबाड तहसिल कार्यालयामधील एका अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. त्यामुळे केवळ कष्टकरी किंवा हातावर पोट असणारेच नव्हे तर नोकरदार मंडळींनाही याच गाड्यांचा आसरा घ्यावा लागतो हे दिसते. अशीच स्थिती जागोजाग आहे.

### फुकाच्या घोषणा बंद करा

परिवहन विभागाने या बेकायदा वाहतुकीचा बंदोबस्त करायला हवा. त्यासाठी नुसतीच या टमटम रिक्षांवर बंदी घालून देखील उपयोग नाही. पर्यायी प्रवासाची व्यवस्थाही त्यांनी पुरवायला हवी. म्हणजेच एसटीच्या जादा गाड्या सोडायला हव्यात. कालच्या अपघातात दुसरी एक बाब समोर आली आहे. ती म्हणजे या भागातील रस्त्यांची कामे बरेच दिवस सुरु आहेत. ती पूर्ण झालेली नसूनही तिथे वाहतुकीला परवानगी दिली गेली आहे. यामुळेही इथे अपघात होत असतात. हा प्रकार मुंबई-गोवा महामार्गावरही पाहायला मिळतो. तिथे जागोजाग डायव्हर्शन्स काढण्यात आली आहेत. याबद्दल माहिती देणाऱ्या पाट्याही आधीपासून नव्हे तर ऐन वळणावर दिसतात. त्यामुळे भरधाव वेगातील वाहने समोरासमोर येतात व अपघात होतात. परिवहन विभाग तसेच पोलिस इत्यादींनी या प्रश्नांवर इलाज करणे हे जनतेच्या अधिक हिताचे आहे. रिक्षावाल्यांना मराठीत बोलायला भाग पाडण्यापेक्षा याचा उपयोग अधिक होईल. मुंबईमध्ये सध्या सर्वत्र मेट्रोचे जाळे पसरवल्याबद्दल सरकार स्वतःची पाठ थोपटून घेत आहे. नवीन विमानतळाचीही मोठी जाहिरात चालू आहे. पण बहुसंख्य मेट्रो स्टेशनमधून बाहेर पडल्यानंतर रिक्षा मिळणे कठीण होते. तेथे शेअर रिक्षाचे प्रस्ताव परिवहन विभागाकडे सादर आहेत. पण त्यांना वेळीच मंजुरी न मिळाल्याने लोकांचे हाल होत आहेत. मुंबईच्या विविध लोकल स्टेशनच्या बाहेरही हीच स्थिती आहे. पूर्वी बेस्ट ही मुंबईची जीवनवाहिनी होती. पण आता बेस्टची संख्या कमालीची कमी झाली आहे. परिणामी स्टेशनपासून उपनगरातील विविध रहिवासी वसाहतींमध्ये जाणाऱ्या बसेसची संख्याही घटली आहे. बांद्रा कुर्ला संकुल हा मुंबईच्या अनेक कार्यालयांचा सध्या पत्ता आहे. लाखो लोक तिथे रोज जातात. पण वांद्रे स्थानकापासून तिथे पोचण्यासाठी प्रचंड पैसे मोजावे लागतात. परिवहन विभागाने या समस्यांकडे लक्ष देण्याची गरज आहे. मुंबई-पुणे रस्त्यावर तसेच घाटामध्ये कायम टँकरचे अपघात होतात. या टँकरचे चालक प्रशिक्षित नसतात. ट्रक व टँकर इत्यादी वेड्यावाकड्या रीतीने वाहने हाकतात. यातून लोकांचे जीव जातात. चालकाचा परवाना मिळवण्याची आपली व्यवस्था अत्यंत भ्रष्ट आहे. रंगांधळे किंवा दृष्टी कमी असलेल्यांनाही हेवी वेईकलचा परवाना मिळू शकतो अशी अवस्था आहे. यावर इलाज करण्याला प्राधान्य द्यायला हवे आहे. मुंबईत रिक्षावाल्यांना मराठी सक्तीचे करणे हे स्वागतार्हच आहे. पण परिवहन खात्याने व फडणवीसांच्या सरकारने त्यापेक्षाही कितीतरी अधिक गोष्टी करण्याची गरज आहे. नुसते लोकांना भुलवण्यापुरत्या घोषणा करणे थांबवायला हवे.

विचार

# इराणचा हल्ला अयशस्वी; पण भारताला चिंता

***इराणची क्षेपणास्त्रे दोन हजार किलोमीटरवर मारा करू शकतात असे सांगितले जात होते; परंतु हिंदी महासागरातील अमेरिका आणि ब्रिटनच्या संयुक्त तळावर हल्ला करून इराणने जगाला आश्चर्याचा धक्का दिला. हा हल्ला अयशस्वी झाला असला आणि अमेरिका आणि ब्रिटनच्या हवाई तळावर झाला असला, तरी इराणच्या हल्ल्यामुळे भारताची चिंता का वाढली आहे, हे समजून घ्यावे लागेल.***



**प्रा. जयसिंग यादव**

हिंद महासागरातील 'दिएगो गार्सिया' हा केवळ एक लष्करी तळ नाही, तर जागतिक सामरिक समीकरणांचा केंद्रबिंदू आहे. अमेरिकेच्या दृष्टीने हा तळ आशिया, मध्यपूर्व आणि आफ्रिका या तिन्ही भागांमध्ये शक्ती प्रक्षेपणासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. अशा ठिकाणी इराणकडून अलिकडेच हल्ला होण्याच्या घटनेकडे केवळ दोन देशांमधील संघर्ष म्हणून पाहणे धोकादायक ठरेल. या घटनेचे पडसाद भारतासह संपूर्ण हिंद महासागर परिसरात उमटू शकतात. हिंद महासागर हा भारताच्या व्यापाराचा मुख्य मार्ग आहे. भारताचे जवळपास ८० टक्के तेल समुद्री मार्गाने येते. या भागात तणाव वाढल्यास ऊर्जा सुरक्षेवर थेट परिणाम होऊ शकतो. दुसरे म्हणजे या प्रदेशातील लष्करीकरण वाढण्याची शक्यता आहे. अमेरिकेचा तळ लक्ष्य झाल्यानंतर या भागात अमेरिका आपल्या उपस्थितीत वाढ करेल, तर इराण आपल्या प्रतिकारक्षमतेचे प्रदर्शन करेल. यामुळे महासागरातील तणाव वाढेल आणि भारताला अधिक सावध भूमिका घ्यावी लागेल. तिसरे म्हणजे भारताच्या किनारपट्टीपासून तुलनेने जवळ असलेला हा भाग अस्थिर झाल्यास गुप्तचर, सायबर आणि दहशतवादी कारवायांचा धोका वाढू शकतो. या संपूर्ण घडामोडींमध्ये चीनची थेट नसली, तरी अप्रत्यक्षपणे अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. चीन गेल्या काही वर्षांमध्ये हिंद महासागरात आपली उपस्थिती सातत्याने वाढवत आहे. 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' धोरणाद्वारे तो श्रीलंका, पाकिस्तान आणि आफ्रिकेतील बंदरांमध्ये गुंतवणूक करून आपली सामरिक पकड मजबूत करत आहे. या भागात अमेरिकेचा प्रभाव कमी झाला, तर चीनला अधिक मोकळीक मिळू शकते. अशा परिस्थितीत चीन इराणला राजनैतिक किंवा आर्थिक पाठिंबा देऊन आपले हितसंबंध पुढे नेऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर चीन-इराण यांच्यातील वाढते संबंधही लक्षात घेण्यासारखे आहेत. ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि संरक्षण क्षेत्रात हे दोन्ही देश सहकार्य वाढवत आहेत. त्यामुळे इराणच्या कारवायांमागे चीनचा थेट हात नसला, तरी त्याला त्यातून धोरणात्मक फायदा मिळू शकतो. इराणने अलिकडेच दोन मध्यम पल्ल्याची बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली; परंतु त्यापैकी एकही आपल्या लक्ष्यापर्यंत पोहोचले नाही. एक क्षेपणास्त्र हवेतच अयशस्वी झाले, तर दुसरे अमेरिकेच्या एका युद्धनौकेने एसएम-३ इंटरसेप्टरच्या साहाय्याने रोखले. इराणचा हा हल्ला अयशस्वी ठरला असला, तरी या घटनेमुळे भारतासमोर सुरक्षा आव्हाने निर्माण झाली. 'दिएगो गार्सिया' हे बेट इराणपासून अंदाजे तीन हजार आठशे ते चार हजार किलोमीटर अंतरावर आहे. आतापर्यंत इराणने आपल्या क्षेपणास्त्रांचा कमाल पल्ला दोन हजार किलोमीटर असल्याचा दावा केला होता; परंतु या बेटावर हल्ला करून त्यांनी आपल्या क्षेपणास्त्रांचा पल्ला यापेक्षा खूप जास्त असल्याचे दाखवून दिले आहे. या हल्ल्यावरून सूचित होते, की इराणच्या खोरमशहरसारख्या क्षेपणास्त्रांचा पल्ला तीन हजार किलोमीटरपेक्षा जास्त असू शकतो. इराणने 'दिएगो गार्सिया'वर केलेला हल्ला भारताच्या 'इंडो-पॅसिफिक' धोरणाला मोठा धोका निर्माण करतो. 'दिएगो गार्सिया' भारतापासून चार हजार किलोमीटर अंतरावर आहे. भारतीय लढाऊ विमाने हवेतच इंधन भरल्याशिवाय तिथे पोहोचू शकत नाहीत. तिथे पोहोचण्यापूर्वी भारतीय नौदलाला पाणबुडीविरोधी युद्धाच्या गंभीर धोक्याचाही सामना करावा लागेल. पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धाची आग आता भारताच्या 'घरात' म्हणजेच हिंद महासागरात पोहोचली आहे. भारतासाठी सर्वात मोठी चिंता इराणची वाढती हल्ला करण्याची क्षमता आहे. आतापर्यंत मानले जात होते, की इराणची क्षेपणास्त्रे केवळ दोन-तीन हजार किलोमीटरचा पल्ला गाठू शकतात; परंतु 'दिएगो गार्सिया'ला लक्ष्य करून इराणने सिद्ध केले आहे, की त्याचा पल्ला चार हजार किलोमीटरपर्यंत वाढला आहे. तांत्रिकदृष्ट्या याचा अर्थ असा की संपूर्ण भारतीय मुख्य भूभाग आता इराणच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांच्या टप्प्यात आला आहे. भारताची लष्करी आणि ऊर्जा पायाभूत सुविधा आता या नवीन 'धोका क्षेत्रात' आहे. भारत आपल्या ऊर्जेच्या गरजांपैकी सुमारे ८० टक्के ऊर्जा सागरी मार्गाने आयात करतो. हिंद महासागरातील 'दिएगो गार्सिया'सारख्या सुरक्षित बंदरांवरील हल्ल्यांमुळे संपूर्ण प्रदेश आता एक सक्रिय युद्धक्षेत्र बनला आहे.

एव्हाना भारतीय तेलवाहू जहाजे आणि व्यापारी जहाजांवरील सुरक्षेचा धोका वाढला आहे. त्यामुळे नजीकच्या भविष्यात देशात इंधनाच्या किमतीमध्ये मोठी वाढ आणि पुरवठ्यात व्यत्यय येण्याची शक्यता आहे. या घडामोडीमुळे भारत एका अत्यंत गुंतागुंतीच्या राजकीय परिस्थितीत सापडला आहे. एकीकडे भारताचे इराणसोबत ऐतिहासिक आणि सामरिक संबंध आहेत, तर दुसरीकडे, हिंद महासागरातील स्थैर्यासाठी भारत अमेरिका आणि ब्रिटनसोबत भागीदारी करतो. 'दिएगो गार्सिया'वरील हल्ल्यानंतर भारताला आपली सामरिक स्वायत्तता टिकवून ठेवणे आणि इराणसोबतचे संबंध संतुलित ठेवणे पूर्वीपेक्षा अधिक कठीण होईल. अनेक दशकांपासून 'दिएगो गार्सिया'ला हिंद महासागरातील एक अभेद्य किल्ला मानले जात होते. ते प्रादेशिक धोक्यांविरुद्ध एक भक्कम तटबंदी म्हणून काम करत होते. हे 'सुरक्षित क्षेत्र' गमावल्यामुळे भारताला आता आपली नौदल आणि क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली अधिक मजबूत करावी लागेल. संरक्षणतज्ज्ञांच्या मते भारताला आता हिंद महासागरात आपली गस्त वाढवावी लागेल तसेच प्रादेशिक शक्तींसोबत नवीन सुरक्षा युती करण्याचा विचार करावा लागेल. इराणच्या अलिकडील 'अयशस्वी' क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे इराण आणि मध्य-पूर्वेतील युद्ध भारताच्या भूभागावर, हिंद महासागरात पोहोचले आहे का आणि याचा भारतासाठी काय अर्थ आहे? दुसरा प्रश्न असा आहे, की नकार देऊनही ब्रिटन या युद्धात सामील झाले आहे का आणि यामुळे त्याची व्याप्ती आणखी वाढेल का? या घडामोडीमुळे भारतासाठी अनेक चिंता वाढल्या असून 'दिएगो गार्सिया'वरील हल्ल्यामुळे युद्ध अधिक तीव्र होण्याची शक्यता वाढली आहे. अमेरिकेच्या हवाई दलाच्या लांब पल्ल्याच्या बॉम्बर्सकडून वारंवार वापरला जाणारा हा ब्रिटिश लष्करी तळ इराणपासून अंदाजे ३,८०० मैल अंतरावर आहे. इराणने डागलेले क्षेपणास्त्र उत्तर कोरियाच्या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्राच्या आधारावर विकसित केले गेले असल्याचे मानले जाते. 'इंडो-पॅसिफिक' आणि हिंद महासागरातील भारताच्या सामरिक स्वातंत्र्यासाठी 'दिएगो गार्सिया' खूप महत्त्वाचे आहे. 'दिएगो गार्सिया'च्या संदर्भात भारत आणि अमेरिका यांच्यात संबंध राहिले आहेत. त्यामुळे असा धोका वाढल्यास भारताचे अमेरिकेवरील अवलंबित्व वाढेल, कारण अमेरिकेशिवाय भारत चीनच्या विस्तारवादावर पाळत ठेवू शकत नाही. अग्नीसारखी लांब पल्ल्याची बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे 'दिएगो गार्सिया'पर्यंत पोहोचण्यास सक्षम आहेत; परंतु ती अण्वस्त्र प्रतिबंधासाठी तयार केली आहेत. तटबंदीयुक्त लष्करी पायाभूत सुविधांवर अचूक पारंपरिक हल्ल्यांसाठी नाहीत. 'दिएगो गार्सिया'मध्ये अमेरिकेची लष्करी मालमत्ता तैनात आहे. त्यात विमानवाहू स्ट्राइक गट, पॅट्रियट/थाड श्रेणीच्या हवाई संरक्षण प्रणाली आणि इलेक्ट्रॉनिक युद्धक्षमता यांचा समावेश आहे. ते बहुतेक पारंपरिक हल्ले निष्प्रभ करू शकतात. शिवाय अमेरिकन आणि ब्रिटिश अणुपाणबुड्या या पाण्यात नियमितपणे कार्यरत असतात. कोणत्याही भारतीय नौदल टास्क फोर्सला हल्ला करण्याच्या टप्प्यात पोहोचण्यापूर्वीच पाणबुडीविरोधी युद्धाच्या गंभीर धोक्याला सामोरे जावे लागेल. ब्रिटन आणि युरोप दोघेही इराणसोबतच्या या युद्धात थेट सहभागी होण्यास संकोच करत आहेत; पण इराणच्या 'दिएगो गार्सिया'वरील क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे ही परिस्थिती बदलेल. ताज्या हल्ल्यामुळे ब्रिटनचा संकोच दूर होईल. या देशाला अमेरिकेच्या छत्राखाली यावे लागेल. इराणच्या हल्ल्यामुळे युरोपला आपले लष्करी तळ सुरक्षित नाहीत, असाही संकेत मिळतो. इराणचा हा हल्ला या युद्धाची तीव्रता आणखी वाढवेल. अमेरिका आणि ब्रिटन यांच्यातील 'विशेष संबंध' इतके घट्ट आहेत, की अमेरिकेच्या कोणत्याही मोठ्या लष्करी कारवाईमध्ये ब्रिटनची तटस्थता जवळपास अशक्य आहे. 'नाटो'च्या चौकटीत, गुप्त माहितीची देवाणघेवाण आणि लष्करी समन्वय आपोआप कार्यान्वित होतात. ब्रिटन हा 'फाइव्ह आईज' आघाडीचा एक अविभाज्य भाग आहे. इराणशी संबंधित कोणत्याही संघर्षात अमेरिकेला गुप्त माहिती देणे त्याला करारानुसार बंधनकारक आहे, मग ब्रिटिश पंतप्रधान कीथ स्टारमर यांची तशी इच्छा असो वा नसो. इतकेच नव्हे, तर 'दिएगो गार्सिया' हा हिंद महासागरातील एक ब्रिटिश प्रदेश आहे, जो अमेरिकेला भाडेतत्त्वावर दिला आहे. मध्य पूर्वेतील अमेरिकेच्या कोणत्याही हवाई कारवाईमध्ये या तळाचा वापर केला जातो. त्यामुळे ब्रिटन आपोआपच एक सहभागी बनतो. या परिस्थितीत इराणचा हल्ला अमेरिका-ब्रिटनपेक्षाही भारतासाठी चिंतेचा विषय आहे.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

चर्चा आजची

# गाढवी नियोजन गाढवांच्या अंगलट

**संतोष राऊळ**

छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या रायगड किल्ल्यावर सध्या मोठ्या प्रमाणात विकास कामं सुरू आहेत. त्यासाठी सरकारकडून करोडो रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्याकाळी कोणत्याही अत्याधुनिक सुविधा नसतानाही प्रचंड गडकिल्ले बांधले गेले, तेही डोंगरावर. आणि आता सर्व सुविधा असतानाही माणूस किल्ले दुरूस्तीसाठी लागणारे साहित्य डोंगरमाथ्यावर पोहोचवू शकत नाही, ही मोठी शोकांतीका आहे. तरीही या परिस्थितीवर मात करण्यासाठी माणसाने यावर तोडगा काढला आहे. रायगडावरील विकास कामांसाठी लागणारं अवजड साहित्य वरपर्यंत नेण्यासाठी गाढवांचं नियोजन करण्यात आलं आहे. या गाढवांच्या पाठिवर साहित्य लादून ते गडाच्या माथ्यावर पोहोचवलं जात आहे. ते गाढव पाठीवर कितीही वजन असलं तरी न थांबता डोंगरमाथा गाठतात. त्यांच्या या महत्वपूर्ण कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. परंतु, रायगडाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या गाढवांचे प्रचंड हाल होताना दिसत आहेत. तसेच, मृत गाढवांना ठेकेदाराकडून उघड्यावर फेकून दिलं जाते. ठेकेदार फक्त बिलासाठी या मुक्या प्राण्यांचा जबरी फायदा घेत असून काम झाल्यावर त्यांना रस्त्यावर सोडायचं काम करत असल्याचं बोललं जात आहे. त्यामुळे रायगडावरील गाढवी नियोजन गाढवांच्याच अंगलट येत असल्याची चर्चा जोर धरत आहे.

ऐतिहासिक किल्ले रायगडच्या विकासासाठी करोडो रुपये मंजूर झाल्यानंतर गेल्या काही वर्षांपासून विविध विकास कामं सुरू आहेत. रायगड संवर्धनाबरोबरच गडावर शिवप्रेमी आणि पर्यटकांसाठी केल्या जाणाऱ्या सोयी सुविधा, तसेच संशोधनात्मक कामं सुरू आहेत. या कामांसाठी लागणारं बांधकाम साहित्य गडावर नेणे मोठं जिकरीचं काम आहे. रोपवेच्या माध्यमातून काही साहित्य नेलं जात असलं तरी



लागणारी वाळू, घडवले जाणारे दगड आणि चुना इत्यादी साहित्य गाढवांच्या पाठीवरून वाहून नेलं जात आहे. किल्ले रायगडावर जाण्यासाठी सुमारे चौदाशेहून अधिक पायऱ्या आहेत. खुबलढा बुरुज व महादरवाजा या ठिकाणी उभा सरळ चढ आहे, अशा पायऱ्यांवर रायगड किल्ला सर करताना माणसाला दमछाक होते. अशा ठिकाणी या गाढवांच्या पाठीवर शेकडो किलोचं ओझं लादून गडावर नेलं जात आहे. या गाढवांचा सोशल मीडियावर देखील कौतुकाचा विषय व्हायरल झाला आहे. परंतु, प्रत्यक्षात मात्र या गाढवांचे या ठिकाणी प्रचंड हाल होताना दिसत आहेत.

किल्ले रायगड परिसरामध्ये या गाढवांचे तळ आहेत. ठेकेदारांनी आणलेली शेकडो गाढवं काम झाले की उघड्यावर बांधून ठेवली जातात. तसेच, त्यांना जागेवर आहार देखील दिला जात नाही. उलट गाव परिसरात या गाढवांना उघड्यावर सोडून दिलं जात आहे. गावभर फिरणाऱ्या या गाढवांची मलमूत्र परिसरात पसरलं जात असल्यानं त्यातून मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरत आहे. तसेच, रायगड सर करताना या पाठीवर शेकडो किलो वजन घेऊन जाणाऱ्या गाढवांच्या तोंडाला फेस येतो. तरी देखील न थांबता या गाढवांचा प्रवास दिवस-रात्र सुरूच असतो. ठेकेदार या गाढवांच्या आरोग्याकडे लक्ष न देता केवळ बिल लादण्यातच गुंग असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये आहे. त्यामुळं गाढव मृत झाल्याच्या घटना यापूर्वी देखील अनेकदा घडल्या आहेत. अत्यंत गंभी बाब म्हणजे महाड-रायगड रस्त्यावर जुन्या कोंझर घाटामध्ये संरक्षक भिंतीच्या जवळच दहा ते पंधरा फुट दरीमध्ये मृत झालेली सुमारे पाच ते सहा गाढवं निर्दयीपणे उघड्यावर टाकून दिलेली आढळली आहेत. त्यामुळे या घाटामध्ये दुर्गंधी पसरली आहे. एका स्थानिक रहिवाशाच्या हे निदर्शनास आल्यामुळे ही घटना समोर आली. ज्या रायगडाच्या विकासामध्ये या गाढवांचे महत्त्वपूर्ण योगदान मानलं जातं त्याच गाढवांचे ठेकेदारांकडून प्रचंड हाल केले जात आहेत. या गाढवांवर ना उपचार केले जात ना त्यांना योग्य आहार दिला जात. अशातच मृत पावल्या जाणाऱ्या गाढवांवर देखील सन्मानानं अंत्यसंस्कार केले जात नाही. हे या घटनेतून समोर आले आहे. त्यामुळं संबंधित ठेकेदार खिसे भरण्यात एवढा गुंतला आहे की, त्याला गाढवांचं निट संगोपनही करता येत नसावं, अशी चर्चा जोर धरत आहे.

या घटनेबाबत स्थानिकांसह प्राणी प्रेमींमधून प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे. त्याच्यांकडून संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावलांनी पावन झालेल्या रायगड किल्ल्यावरील विकास कामांसाठी ही गाढवं महत्वपूर्ण कामगिरी बजावत आहेत. आणि त्यांनाच अशी वागणुक मिळणं दुर्दैवी असल्याचे बोलेले जात आहे. त्यामुळे रायगडावरील विकासकामांमध्ये महत्त्वाची भुमिका बजाविण्यासाठी गाढवी नियोजन गाढवांच्याच अंगलट आल्याच्या चर्चा स्थानिकांमधून होत आहेत.

लोकसंसद

## भारतीय हवामान खात्याने अचूक अंदाज वर्तवणे महत्वाचे

यंदाच्या वर्षी पाऊसमान कमी असल्याचे वृत्त समोर आले आहे हवामान अंदाजासाठी प्रसिद्ध असलेल्या भारतीय हवामान खात्याने देशांत ९० ते ९५ टक्के पाऊस बरसेल असे भाकीत केल्याने यंदा पर्जन्यमान भारतीय उपखंडावर नाराज होणारं की काय ? असा सवाल शेतकरी वर्गातून विचारला जात आहे जून ते सप्टेंबर दरम्यान अल निनोचा प्रभाव रहाणारं असेही सांगण्यात आले आहे हा पहिला अंदाज असून मे अखेर दुसरा अंदाज वर्तवला जाणार आहे आपला देश कृषिप्रधान म्हणून जगामध्ये ओळखला जातो त्यामुळे येथील शेतकरी आपापल्या राज्यामध्ये कृषिपुरक हवामानानुसार विविध पिकांचे उत्पादन घेत असतो भारत सरकारकडून शेतकऱ्यांच्या माहितीसाठी टीव्ही, रेडिओ, मोबाईल, वर्तमानपत्र यासारख्या माध्यमातून हवामानाचा अंदाज वर्तवला जातो पावसाचा अंदाज सांगितल्यामुळे शेतकरी यावर विश्वास ठेवून पेरणी करतात पण गेल्या काही वर्षांपासून हवामानाचा अंदाज फोल ठरत असल्याचे वरचेवर निष्पन्न झाले आहे शेतकरी महागडी औषधे, बि-बियाणे, कर्ज काढून शेती पिकवत असतो पण भारतीय हवामान खात्याच्या चुकीच्या अंदाजामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना फटका बसत आहे.काही शेतकरी संघटनांनी वेधशाळेवर प्रश्न उपस्थित केला होता त्यामुळे भारतीय हवामान विभाग सक्षम, व अचूक ठरणे हिताचे आहे शेतकऱ्यांसाठी हवामान अंदाज फार महत्वाचा असतो मान्सूनवरचं शेतीचे गणित अवलंबून असते त्यामुळे हवामान अंदाज अचूक वर्तवणे अतिशय महत्वाचे असून त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरणे शेतकऱ्यांच्या हिताचे आहे !

**- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

दिनविशेष

# विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन

जगातला सर्वात लोकप्रिय अभिनेता, विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन याची जयंती आहे. पहिल्या महायुद्धाच्या अगोदाच्या काळात मुकपटात अभिनय करून आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीने प्रेक्षकांना मनमुराद हसावणाऱ्या चार्ली चॅप्लिन यांचा जन्म १६ एप्रिल १८८९ रोजी लंडन येथे झाला. चार्ली चॅप्लिन यांनी आपल्या अभिनयाची सुरवात शालेय जीवनापासूनच केली. वयाच्या नवव्या वर्षी शाळेतल्या नृत्यपथकात त्यांची निवड झाली. या नृत्यपथकाद्वारे सादर होणाऱ्या कार्यक्रमात ते अभिनय आणि नृत्य करत. त्यांची आई मानसिक आजाराने त्रस्त असल्याने वयाच्या तेराव्या वर्षीच त्यांना शाळा सोडावी लागली. अर्थाजनासाठी ते लहान मोठे कामे करू लागले. घरची परिस्थिती हलाखीची असूनही त्यांनी आत्मविश्वास कमी होऊ दिला नाही. परिस्थितीने उलट त्यांना खंबीर बनवले. त्यावेळेच्या परिस्थितीबद्दल चार्ली चॅप्लिन आपल्या आत्मचरित्रात म्हणतात "मला त्या परिस्थितीचे चटके फार काळ सहन करावे लागले नाही कारण आम्ही त्या परिस्थितीतून सतत वाटचाल करत होतो आणि लहान असल्यामुळे हा त्रास मी सहज विसरून जायचो." त्यांचा आत्मविश्वास कणखर होता छोटीमोठी कामे करूनही ते कधीही आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत. मोठा अभिनेता होण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी ते नाटक कंपन्यांना नित्यनियमाने संपर्क साधत. त्यांच्या मेहनतीला फळ मिळाले त्यांना अनेक नाटकात भूमिका मिळू लागल्या. पुढे मोठया पडद्यावर देखील त्यांना संधी मिळत गेली. पडद्यावरील त्यांचे मस्तमौला आगळेवेगळे रूप प्रेक्षकांना खूप भावले. पडद्यावर त्यांची इन्ट्री झाली की प्रेक्षक खळखळून हसत. एक टाईट कोट, छोटी हॅट, मोठे शूज आणि चेहऱ्यावरील छोटीशी मिशी असं त्यांचं पडद्यावरील वेडगळ रूप प्रेक्षकांना खूप भावले. हे वेडगळ रूप प्रेक्षकांना इतकं आवडलं की पुढं हेच त्यांचं वेडगळ रूप त्यांची ओळख बनली. या व्यक्तिरेखेबद्दल ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात "ज्या क्षणी मी तो पोशाख केला, मेकअप केला, त्याच क्षणी मी ती व्यक्तिरेखा अनुभवू लागलो. मी त्याला ओळखयचो आणि रंगमंचावर असेपर्यंत तो माझ्यात भिनलेला असायचा." चार्ली चॅप्लिन यांनी आयुष्याचं सार पडद्यावर अनेक तऱ्हेने जगपुढे मांडले. खिल्ली उडवण्यासाठी दुःख हे कारण असतं. खिल्ली उडवणे म्हणजे प्रतिकार करणे निसर्गाच्या शक्तीपूढे स्वतःच्या हतबलतेतही आपण हसत राहिले पाहिजे. प्रतिकुलतेचा हसत हसत सामना केला पाहिजे, नाहीतर मानसिकरीत्या खचून जाल असे ते म्हणत म्हणूनच त्यांच्या आयुष्याच्या जवळचा चित्रपट 'द कीड' याचं ओपनिंग टायटल होतं 'अ पिक्चर विथ अ स्माईल अँड परहॅप्स अ टियर.' स्वतःच दुःख विसरून आईचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी पडद्यावर वेडगळ भूमिका करुन जगभरातील प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. भाषेच्या बंधनाविना पडद्यावरून तो कुठल्याही प्रेक्षकांशी संवाद साधू शकला त्यासाठी त्यांनी वापरलेले साधन म्हणजे भरपूर हासू आणि थोडेसे आसू. चार्ली चॅप्लिन यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रेक्षकांना गडबडा लोळायला लावून हसवत आणि दुसऱ्याच क्षणी डोळ्यात पाणी आणून रडवत. आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी अनेक युक्त्या करून त्या पडद्यावर साकारल्या आणि गाजवल्या. जागतिक पटलावर महानायक म्हणून ते आयुष्यभर वावरले. पहिल्या महायुद्धाच्या काळातही त्यांनी लोकांना हसवण्याचे कार्य केले. २५ वर्षानंतर जागतिक मंदी आणि हिटलरच्या काळातही त्यांनी प्रेक्षकांना हसवण्याचे कार्य थांबवले नाही. लोकांना ज्याकाळात मनोरंजनाची आणि हास्याची अधिक गरज होती त्याकाळात चार्ली चॅप्लिन यांनी लोकांसाठी उत्तम भूमिका बजावल्या. २५ डिसेंबर १९७७ रोजी प्रेक्षकांना खळखळून हसवणारा हा महान अभिनेता पप्रेक्षकांना दुःख सागरात लोटून काळाच्या पडद्याआड गेला. चार्ली चॅप्लिन यांना जयंतीदिनी भावपूर्ण आदरांजली.

**- श्याम ठाणेदार**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१६ एप्रिल
१) श्री.शरद गोविंद देशमुख
पिंपळभाट, अलिबाग,
दि.१६-४-१९५४


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५**

**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


# ऐन उन्हाळ्यात वृक्षारोपणाचा शो

## ● तापमानाचा पारा वाढलेला असताना महामार्ग विभागाकडून वृक्षलागवड

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणात रस्त्याच्या कडेला असलेली शेकडो वर्षांपूर्वीची मोठमोठी वृक्ष तोडण्यात आली असून हे महामार्गाचे काम गेली सतरा वर्षे रखडलेले आहे. असे असतानाच आता राष्ट्रीय महामार्ग विभागाने एक नवा अजब कारनामा सुरू केला आहे. रत्नागिरी जिल्ह्यात तापमानाचा पारा ४० ते ४२ अंश सेल्सिअसवर पोहोचलेला असताना, महामार्गाच्या दुतर्फा आणि दुभाजकांमध्ये झाडे लावण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. मात्र, या कडाक्याच्या उन्हात ही कोवळी रोपे तग धरणार का? असा संतप्त सवाल पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे.



एप्रिल महिन्याच्या मध्यात जेव्हा सर्वत्र पाणी टंचाईची झळ जाणवत आहे, अशावेळी महामार्ग विभागाने खड्डे खोदून रोपे लावण्यास सुरुवात केली आहे. १५ एप्रिलनंतर उन्हाची तीव्रता अधिक वाढलेली असताना ही रोपे केवळ नावापुरती लावली जात आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. ही झाडे जगवण्यासाठी संबंधित यंत्रणा सातत्याने पाणी देणार का? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते शाहनवाज शाह यांनी केला असून, त्यांनी याविरोधात १ मे रोजी खड्डे दफन आंदोलनाचा इशारा दिला आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी टप्पा १ ते १० दरम्यान तब्बल १ लाख ६ हजार ७३७ जुन्या वृक्षांची तोड करण्यात आली होती. नियमानुसार तोडलेल्या झाडांच्या बदल्यात नवीन वृक्षारोपण करणे कंत्राटदाराला बंधनकारक होते, मात्र १० वर्षांनंतर आता कुठे प्रशासनाला जाग आली आहे.

एककीडे वृक्षारोपणाचा फार्स सुरू असताना, दुसरीकडे महामार्गाचे प्रत्यक्ष काम अद्याप अपूर्णच आहे. माणगाव बायपास, इंदापूर आणि परशुराम घाटातील एक लेन अद्याप बंद आहे. तर चिपळूण, संगमेश्वर आणि राजापूर येथील उड्डाणपूल अपूर्ण स्थितीत आहेत. दरम्यान, महामार्गावर सावलीसाठी झाडे लावणे गरजेचे असले तरी, त्याची वेळ चुकल्याने प्रशासनावर टीकेची झोड उठत आहे. केवळ ठेकेदाराचे बिल काढण्यासाठी हा शो सुरू आहे की, खरोखरच पर्यावरण रक्षणासाठी, हे येणारा काळच ठरवणार आहे.

### सरकारी निधीचा अपव्यय?

पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, झाडे लावण्यासाठी मे महिन्याचा शेवट किंवा पावसाळ्याची सुरुवात म्हणजेच जूनचा पहिला आठवडा सर्वात योग्य असतो. कडाक्याच्या उन्हात लावलेली झाडे १० ते १५ दिवसांतच सुकून जाण्याची भीती असते. यामुळे सरकारी निधीचा अपव्यय होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## संत गोरोबा काका पुण्यतिथी साजरी

**म्हसळा :** कुंभार समाज अध्यक्ष नंदकुमार गोविलकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री संत गोरोबा काका यांची ७०९ वी पुण्यतिथी म्हसळा येथील कुंभार समाज मंदिरात उत्साहात साजरी करण्यात आली. पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संत गोरोबा काका यांच्या प्रतिमेचे पूजन करुन संपूर्ण म्हसळा शहरातून संत गोरोबा काका यांची पालखी फिरविण्यात आली. टाळ मृदूंगाच्या तालासुरात संतांच्या जयघोषात लहानथोर मंडळी या गजरात तल्लीन झाले होते.

## स्वामी समर्थांच्या पालखीचे स्वागत

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखीचे श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ मुरूडच्या वतीने थाटामाटात मुरुड नगरीत स्वागत करण्यात आले. तद्नंतर पालखी शहरातील विविध ठिकाणी फिरुन आल्यानंतर गावदेवी पाखाडी येथील उदय सबनीस यांच्या निवासस्थानी पालखीचे भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले.



फुलांची उधळण करीत आणि श्री स्वामी समर्थच्या जयघोषात पालखीचे स्वागत करण्यात आले. जय जय स्वामी समर्थच्या नामघोषात महिला वर्गाकडून स्वामींच्या पादुकांचे पूजन व औक्षण करण्यात आले. यावेळी शेकडो भाविकांनी पालखी व मूळ पादुकांचे दर्शन घेतले. भक्तीमय वातावरणात भाविकांनी श्री स्वामी समर्थची आरती करण्यात आली. येणाऱ्या भाविकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकाडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

यावेळी संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

## पायी मिरवणुकीत अनुयायांचा उत्साही सहभाग

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुका बौद्ध समाज सेवा संघ केंद्रीय समिती आणि स्थानिक तालुका समिती व विभागीय शाखा क्रमांक १,२,३ संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि धम्म संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मुरूड अलंकापुरी येथील धम्म स्मारकाजवळ ध्वजवंदन करण्यात आले.


(गणेश चोडणेकर)

यावेळी फटक्यांच्या आतषबाजीत, वाजत-गाजत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी या मिरवणुकीत बालकलाकार राजे शिवछत्रपती महाराजांना विशेष लक्ष वेधून घेत होते. ही मिरवणूक डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक-अलंकापुरी, दरबार रोड, नगरपरिषद कार्यालय, बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पुन्हा बाबासाहेब स्मारकापर्यंत काढण्यात आली.

यावेळी केंद्रीय समिती अध्यक्ष किशोर शिंदे, प्रदीप उमटेकर, सुरेश मोरे, सचिव धर्मेश मोरे, मनोहर तांबे, सचिव मंगेश येलवे, सुभाष मोरे, सचिव वसंत सोरे, नामदेव गायकवाड, सचिव गौतम मोरे, नरेंद्र जाधव, उपसचिव लताताई दाभणे, जनार्दन शिंदे, प्रकाश जाधव आदींसह अनुयायी यावेळी उपस्थित होते.

## वावेळवाडी शाळेत महामानवाला अभिवादन

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा क्रांतीचा मंत्र देणारे, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती श्रीवर्धन तालुक्यातील राजिप शाळा, वावेळवाडी येथे साजरी करण्यात आली.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी महानायक बाबासाहेबांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करत आपल्या बाबासाहेबांबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी विद्यार्थ्यांनी याप्रसंगी उत्स्फूर्त भाषणे केली. डॉ. बाबासाहेबांचे बालपण, त्यांचा शिक्षणासाठीचा संघर्ष आणि त्यांनी समाजाला दिलेला समतेचा विचार यावर विद्यार्थ्यांनी प्रकाश टाकला. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच आज आपल्याला शिक्षणाची कवाडे खुली झाली आहेत', असे प्रतिपादन यावेळी शिक्षकांनी केले.

## 'कृत्रिम बुद्धिमत्तेसोबत सृजनता आवश्यक'

**म्हसळा :** कोमसाप म्हसळा शाखा आयोजित केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयात कवी जितेंद्र मांजरेकर लिखित 'पंख मायेचे' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याला आणि कृत्रिम बुद्धिमत्तेला धोका आहे काय? या विषयावरील परिसंवादाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले ज्येष्ठ साहित्यिक तथा कोकण मराठी साहित्य परिषद विश्वस्त एल.बी. पाटील यांनी आपल्या मनोगतात मानवता हाच खरा धर्म असून प्रत्येकाच्या मनात सृजनता असणे गरजेचे असल्याचे सांगितले.

## सुरज कान्हेकर ठाणे पोलीसपदी



**खांब :** रोहा तालुक्यातील देवकान्हे गावचा सुपुत्र सुरज शरद कान्हेकर याची नुकतीच ठाणे पोलीसपदी निवड करण्यात आली आहे. सुरज कान्हेकर याच्या या निवडीमुळे कान्हेकर कुटुंबाचे नाव उंचावले आहे. कुटुंबाची परिस्थिती अतिशय नाजूक असतानादेखील सुरजने आपली जिद्द आणि चिकाटी सोडली नव्हती. त्याने पोलीस होण्याचे स्वप्न त्याने पूर्ण करून दाखवले आहे. सुरज कान्हेकर पोलीस झाल्याने समस्त कान्हेकर परिवारातून आनंद व्यक्त करून देवकान्हे गावातून त्याची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी उद्योजक नारायण कान्हेकर, सुरजचे वडील शरद कान्हेकर, सामाजिक कार्यकर्ते रविंद्र कान्हेकर, तंटामुक्ती अध्यक्ष अविनाश कान्हेकर, निलीमा कान्हेकर व ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान त्याच्या या निवडीबद्दल समाजातील सर्वच स्तरातून त्याचे अभिनंदन केले जात आहे.

## खांदा कॉलनीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

**पनवेल :** खांदा कॉलनी येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव समितीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. मुलगंधकुटी बुद्ध विहार येथे सकाळी पंचशील ध्वजारोहण करून ध्वजाला सलामी देत कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. १२ एप्रिल रोजी लहान मुलांसाठी चित्रकला, वक्तृत्व, नृत्य व गायन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये परिसरातील बालकांनी उत्साहात सहभाग घेत आपली कला सादर केली. १४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता युवा व्याख्याते अॅड. विवेक



भोपी यांनी प्रेरणादायी व्याख्यानातून डॉ.आंबेडकरांनी लिहिलेल्या भारतीय संविधानाचे महत्त्व विशद केले. सायंकाळी खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भव्य मिरवणुकीला सुरुवात झाली.

## संत शिरोमणी गोरा कुंभार पुण्यतिथी साजरी

### गालसुरे गावात भक्तीचा जागर

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील गालसुरे येथे संत शिरोमणी गोरा कुंभार यांच्या पुण्यतिथीनिमित्त पारंपरिक वेशभूषा आणि पालखी सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. या उत्सवाच्या आयोजनात स्थानिक कुंभार समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. आपल्या पूर्वजांची परंपरा भक्तिभावाने आणि कौशल्याने पुढे नेणाऱ्या या समाजामुळे संपूर्ण गाव विठ्ठल नामाच्या गजरात आणि लेझीमच्या तालावर भक्तिमय झाले होते.



संत गोरा कुंभार हे वारकरी संप्रदायातील अत्यंत आदरणीय संत त्यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून गालसुरे येथील कुंभार समाजाने पुढाकार घेऊन हा उत्सव आयोजित केला होता. विशेष म्हणजे, समाजातील बांधवांनी आपल्या हस्तकलेचा वापर करून फुलांनी सजवलेली पालखी अत्यंत नयनरम्य आणि आकर्षक बनवली होती. उत्सवाचे वैशिष्ट्य असलेल्या पारंपरिक वेशभूषेत अनेक ग्रामस्थ वारकरी रूपात सहभागी झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात पहाटेच्या भजनांनी आणि विठ्ठल नामाच्या जयघोषाने झाली. त्यानंतर श्री विठ्ठलाची मूर्ती पालखीत विराजमान करण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीमच्या तालावर निघालेल्या या पालखी सोहळ्यात आबालवृद्धांनी मोठा सहभाग नोंदवला. वेशभूषाधारी कलाकारांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. या सोहळ्यासाठी स्थानिक भाविक आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य सुधारले | ग्रंथालयातील १७५ पुस्तकांचा प्रभावी वापर**

# खाड्याचा पाडा येथील शाळेत वाचन तास उपक्रम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये अनेक नवनवीन उपक्रम तेथील शिक्षक वर्गाकडून सुरु केले जातात. त्यातील बहुसंख्य उपक्रम हे विद्यार्थीप्रिय असतात. कर्जत तालुक्यातील खाड्याचा पाडा येथील शाळेत विद्यार्थ्यांसाठी 'वाचन तास' हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

रायगड जिल्हा परिषद शाळा, खाडयाचा पाडा येथे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचन कौशल्य वाढावे आणि आत्मविश्वास बळकट व्हावा या उद्देशाने रोज दुपारच्या सुट्टीत वाचन तास हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त



प्रतिसाद मिळत असून शाळेतील शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध झाले आहे. शाळेतील ग्रंथालयातील तब्बल १७५ पुस्तकांचा प्रभावी वापर करून हा वाचन तास सुरू करण्यात आला.

सुरुवातीला काही विद्यार्थ्यांना वर्गासमोर वाचताना संकोच वाटत होता; मात्र नियमित प्रकट वाचनामुळे हा संकोच दूर झाला. दररोज एक विद्यार्थी वर्गासमोर पुस्तकाचे प्रकट वाचन करतो, तर इतर विद्यार्थी शांतपणे व लक्षपूर्वक वाचन ऐकतात. या प्रक्रियेमुळे शब्दोच्चार, आवाजातील चढ-उतार, थांबे घेणे तसेच प्रभावी सादरीकरण याबाबत विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य लक्षणीयरीत्या सुधारले आहे. यासोबतच आकलनासाठी वाचन करण्याची सवय लागल्याने गोष्टीतील संदेश, पात्रांचे स्वभाव आणि आशय समजून घेण्याची क्षमता वाढली आहे.

या उपक्रमासाठी मार्गदर्शन व प्रेरणा देणारे शिक्षक संतोष नाटिकर यांचे शाळा परिसरातून विशेष कौतुक होत आहे. शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी असा वाचन तास प्रत्येक शाळेत राबविणे आवश्यक असल्याची भावना पालक व ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

### वाचनाची उत्सुकता वाढली

शाळेत बनवण्यात आलेल्या या वाचन तासासाठी ठेवण्यात आलेली पुस्तके अल्पावधीतच विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील सर्व पुस्तके आवडीने वाचून पूर्ण केली आहेत. तर आता नवीन पुस्तके वाचण्याची उत्सुकता वाढली आहे. या वाचन संस्कारांचा परिणाम घरीही दिसून येत असून विद्यार्थी पालकांकडे नवीन पुस्तके आणण्याचा आग्रह धरत आहेत. त्यामुळे पालकांमध्येही समाधानाचे वातावरण आहे. यशस्वी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून पुस्तके ही त्यांची जिवलग मित्र बनली आहेत.

# निवडक

## महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**उरण :** ज्यांच्यामुळे लाखों घरांचा उद्धार झाला, माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला, महिलांना त्याचे स्वातंत्र्य व अधिकार मिळाले, दीन दुबळ्यांना जगण्याचा अधिकार मिळाला. ज्यांनी संविधानरुपी समतेचा अधिकार दिला अशा महान थोर समाज सुधारक, भारतीय घटनेचे शिल्पकार, कायदेतज्ञ डॉ. मुंबई-गोवा आंबेडकरांची जयंती उरण महाविद्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी डॉ. एच.के. जगताप, डॉ. एम.जी. लोणे आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ए.के गायकवाड यांनी केले. प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांनी महात्मा फुले, छ. शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांचे विचार अंगीकरण्याची आवश्यकता आहे, असा उपदेश उपस्थितांना दिला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी माहिती दिली. डॉ. जगताप यांनी डॉ. आंबेडकर यांचे कृषी व आर्थिक धोरण विषद केले. तर डॉ. लोणे यांनी डॉ. बाबासाहेबांची पत्रकारिता या विषयी आपले विचार मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दत्ता हिंगमिरे आणि आभार प्रदर्शन डॉ. ए. आर. कांबळे यांनी केले. आदर्श महापुरुषांचा वारसा व त्यांचे आदर्श गुण अंगीकरण्याबाबत या कार्यक्रमातून आवाहन करण्यात आले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीही मोठया प्रमाणात उपस्थित होते.

## नवीन पनवेलमध्ये प्रेरणादायी उत्सव



**पनवेल ग्रामीण :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त नवीन पनवेलमध्ये उत्साहपूर्ण आणि विचारप्रवर्तक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जवाहरलाल नेहरू पतन प्राधिकरण आणि एससी, एसटी एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्राध्यापक प्रियांका डोके-मंडलिक यांचा विशेष सत्कार करण्यात आला. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करताना सध्याच्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य केले. यावेळी त्यांनी शिक्षणाच्या गुणवत्तेवरही भर देत, शिक्षण हे केवळ पदवी मिळवण्यासाठी नसून ते व्यक्तीला विचारशील, स्वाभिमानी आणि जबाबदार बनवणारे असले पाहिजे, असे मत व्यक्त केले. चुकीच्या माहितीविरोधात जनजागृती करण्याचीही आजच्या काळात तितकीच गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात उपस्थितांनी बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करत सामाजिक समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांचा अंगीकार करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## म्हसळ्यात नामफलकाचे अनावरण

**म्हसळा :** डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांची १३५ वी जयंती म्हसळा तालुक्यात आनंदी वातावरणात साजरी झाली. यानिमित्त भारतीय बौद्ध महासभेतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी म्हसळा पोलीस ठाणे, म्हसळा नगरपंचायत, म्हसळा एस. टी. स्टॅन्ड, न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा येथे शैक्षणिक उपक्रमांसह नामफलकाचे अनावरण करण्यात आले. तसेच ग्रामीण रुग्णालय म्हसळा येथे बाह्यरुग्णांना फळांचे वाटप तसेच मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी म्हसळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे, बौद्धसमाज तालुका शाखा म्हसळा बौद्धजन पंचायत समिती म्हसळा आणि म्हसळा तालुका बौद्धजन समिती मुंबईचे सर्व सन्माननीय व बौद्ध भिक्षुक आणि महिला मान्यवर उपस्थित राहून जयंती कार्यक्रम यशस्वी केला.



## खोपोलीत भीम अनुयायांची गर्दी

**खोपोली :** खोपोलीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती महोत्सव मंगळवारी (दि.१४) खोपोली नगरपरिषदेच्या वतीने जल्लोषात साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भव्य पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी सकाळपासून शहरातील विविध भागातील भीमअनुयायांनी गर्दी केली होती. सकाळी १० वाजता भारतीय बौध्दमहासभा आणि भारतीय बौध्दमहासंघ यांच्या वतीने बुध्दवंदना झाल्यानंतर नगराध्यक्ष कुलदिपक शेंडे, पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्यासह सर्व नगरसेवकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाला अभिवादन करण्यात आले. नगराध्यक्ष शेंडे यांच्या हस्ते पंचशील आणि निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. खोपोली शहरातील शांतीनगर, काजुवाडी, प्रकाश नगर, भानवज बौध्दवाडा, खालची खोपोली यांनी भव्य मिरवणूक काढली. दिवसभर मोठ्या उत्साहात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे कार्यक्रम पार पडले.

## डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा जागर



**चिरनेर :** उरण तालुक्यात जासई, दिघोडे, विंधणे, कळंबुसरे, पिरकोन व द्रोणगिरी नोड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. सकाळी पूजापाठ, विधी व पंचरंगी ध्वजाला वंदन करण्यात आले. यावेळी व्याख्यानातून बाबासाहेबांच्या विचारांचा जागर मांडण्यात आला. यावेळी लहान मुलांचे व महिलांचे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. तर सायंकाळी भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. कार्यक्रमाला येथील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

## निवडक



### रसायनशास्त्रातील उदयोन्मुख प्रवाहांवर चर्चा

**माणगाव** : माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालयात (दि.११) एप्रिल रोजी रसायनशास्त्रातील उदयोन्मुख प्रवाह: सीमांपलीकडील नवोपक्रम या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद उत्साहात पार पडली. ग्रामीण भागात अशा दर्जेदार आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन होणे, ही माणगावच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरली. अंजुमन इस्लाम डिग्री कॉलेज मुरुड-जंजिरा, वीर वाजेकर महाविद्यालय उरण, जी. एम. वेदक कॉलेज तळा, भाऊसाहेब नेने महाविद्यालय पेण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय महाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. ॲड. राजीव अशोक साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली परिषद यशस्वीपणे पार पडली. याप्रसंगी डॉ. गौतम राऊत, डॉ. विश्वनाथ पाटील, डॉ. मुकुंद तंटक, डॉ. संजय सोनावले डॉ. मधुकर बडगुजर यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर, डॉ. सदानंद धारप, डॉ. सजिद शेख, डॉ. सचिन बंगाले, डॉ. आमोद ठक्कर, डॉ. योगेश बोराले यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच संयोजक प्रा. मेहरीन डावरे, प्रा. शोएब खान, डॉ. गुरमीत वाधवा, प्रा. जे. व्ही. देवरे, डॉ. एम. एच. साळुंके आणि डॉ. पी. एम. खंडारे यांनी परिषदेच्या यशासाठी परिश्रम घेतले.



### पुलाला कठडे बसविण्याची मागणी

**सुतारवाडी** : रोहा तालुक्यातील सुतारवाडी जवळील दुरटोलीकडे जाणाऱ्या रहदारीच्या पुलाला संरक्षक कठडे नसल्यामुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. दुरटोलीकडे जाण्यासाठी सुमारे चार ते पाच मीटर अंतराचा पूल आहे. या पुलावरून दुरटोली, वाकी वाडी, गौळवाडी कामत या मार्गाकडे जवळचा मार्ग असल्यामुळे या पुलावरून सातत्याने नागरिक मोठ्या प्रमाणावर ये-जा करत असतात. विशेषतः सुतारवाडी हे ठिकाण या गावांना मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे या ठिकाणी विविध प्रकारची दुकाने असल्यामुळे, येथून जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असते. विशेषता दुचाकी आणि तीन चाकी वाहन सातत्याने धावत असतात. पुलाला संरक्षक कठडे असणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत संबंधित खात्याने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन येथील पुलाला संरक्षक कठडे बसविण्याची व्यवस्था करावी अशी नागरिकांची मागणी आहे.

### चिरनेर येथे सांस्कृतिक कार्यक्रम

**चिरनेर** : श्रीसंत शिरोमणी गोरोबा काका पुण्यतिथी सोहळ्याचे चिरनेर कलानगर (उरण) येथे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांना सोमवारी(दि.१३) सुरुवात झाली. या गोरोबा काकांच्या पुण्यतिथी सोहळ्याची सांगता गुरुवारी( दि.१६) रोजी होणार आहे. पुण्यतिथी सोहळ्यातील धार्मिक विधींचा मान दीपक गोरे, नारायण चिरनेरकर, सचिन कुंभार तसेच अन्य कार्यकर्त्यांना दिला असून, त्यांच्या हस्ते महापूजा, अभिषेक कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे.अध्यक्ष चेतन चौलकर, उपाध्यक्ष संतोष चौलकर, सचिव दीपक गोरे, खजिनदार बबन हातनोलकर, गणेश चिरनेरकर, नंदकुमार चिरनेरकर, कामिनी हातनोलकर, शितल वरवटकर, सोनाली चिरनेरकर, श्रद्धा चिरनेरकर या पदाधिकाऱ्यांसह कुंभार समाजातील नागरिक विशेष परिश्रम घेत आहेत.



### रेवा कॉलेजचा रंगोत्सव स्पर्धेत यश

**रोहा** : रोह्यातील अंजुमन-ए-इस्लाम जंजिरा उर्दू हायस्कुल केंद्रात आंतरराष्ट्रीय रंगोत्सव स्पर्धा पार पडल्या होत्या. या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या स्पर्धेत रोहा एज्युकेशनल ॲण्ड वेल्फअर असोसिएशन ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्सच्या १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत १९ पैकी १९ विद्यार्थी पास होऊन घवघवीत यश संपादन केले आहे. या विद्यार्थ्यांना नेहा इम्तियाज भुरे यांचे मोलाचे मार्गदर्शन केले होते. प्राचार्य सुमय्या मुजावर, नेहा भुरे, असमा वेळासकर, सबीया पेडेकर, जुवेरिया सिद्दीकी, सबा खान या शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला** मुले पाहिजेत १२/१५ वी पास, १५००० महिना, ठिकाण- बामणसुरे संपर्क -९८२३५८५३२१
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, हाऊसकीपर,रेस्टॉरंट कॅप्टन, हाऊसकिपिंग सुपरवायझर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसॲपवर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- **बिल्डींग मटेरियल शॉप मध्ये** अनुभवी सुपरवायजर हवा आहे. पेमेंट : २१०००-२५०००, संपर्क - ८००७८९३२३२
- **शेतावर राहून काम करण्यासाठी** जोडपे पाहिजे. संपर्क - ९८२२००१८५३
- **पाहिजेत- पाण्याच्या पंपाच्या** दुकानात कामासाठी कायमस्वरूपी शिकाऊ कामगार, प्लंबर, मेकॅनिक पाहिजे. तसेच कॉन्ट्रक्ट बेसीसवर काम करण्यासाठी मेकॅनिक पाहिजेत. बाहेरगावच्या व्यक्तसाठी राहण्याची सोय. संपर्क - ९८२२००१८५३
- **कामासाठी माणसे/मुलगे पाहिजे.** १) कंपनीचे मोबाईल विक्रीसाठी दुकानदारांकडे उरण, उलवा/महाड-माणगाव, पेण-पोयनाड २) डिलेवरी एस.टी. ने अथवा बाईकने (पेण-अलिबाग) (रेवदंडा-मुरूड-अलिबाग) लायसन्स पाहिजे. (बाईक आमची) ३) कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. ४) पार्ट/फुल टाईम चालेल. (संपर्क : ८८८८२२०२२१)

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# माथेरान घाटात बिबट्याचे दर्शन

## वन विभागाकडून गावबैठका घेण्यास सुरुवात, अधिकाऱ्यांची जंगल परिसरात जाऊन पाहणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान आणि पायथ्याशी असलेल्या वन क्षेत्रात वन्यजीवांचे वास्तव्य असल्याच आढळून आले आहे. मंगळवारी (दि.१४) एप्रिल रोजी रात्री माथेरान घाट रस्त्याने प्रवास करणारा बिबट्या अनेकांचे नजरेस पडला. हा बिबट्याला टॅक्सी चालकाने आपल्या मोबाईलमध्ये कैद केल्याने बिबट्याचा वावर माथेरान जंगलात आहे हे पुन्हा सिद्ध झाले आहे. दरम्यान, बिबट्याच्या दर्शनाने वन विभागाने स्थानिक रहिवाशी यांना सतर्क राहावे अशी सूचना करण्यास फलकबाजी सुरू केली आहे.



माथेरानच्या डोंगरात सातत्याने बिबट्याचा वावर आढळून आला आहे. यावर्षी जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात माथेरान डोंगरातील वाड्यांमध्ये बिबटे पोहचले होते. त्याचवेळी कुंभे आंबिवली भागात देखील त्यांचा वावर दिसून आला होता. त्यावेळी माथेरान नेरळ आणि कर्जत पश्चिम वन विभागाच्या दुरशेत्र कार्यालयाकडून स्थानिक लोकांच्या गाव बैठका घेण्यात आल्या होत्या, त्यात सूचनांचा पाऊस पडला होता. मात्र, अनेकवेळा बिबट्याचे दर्शन तसेच वहिवाट दिसून आल्यानंतर त्या बिबट्यांकडून कोणताही धोका उद्भवला नव्हता. मागील एक महिन्यात कुठेही बिबट्याचा वावर दिसून आला नव्हता.

मात्र, १४ एप्रिल रोजी रात्री साडे सात वाजण्याच्या सुमारास माथेरान घाटात मुख्य रस्त्याने बिबट्याची धावपळ सुरू होती. त्यावेळी माथेरान येथील रहिवाशी असलेले टॅक्सी चालक महेंद्र जाबरे हे प्रवासी घेऊन नेरळ स्टेशनकडे येत होते. त्यावेळी गार्बेट रस्त्याच्या बाजूला हा बिबट्याचे दर्शन झाले. त्यावेळी गाडीच्या हेड लाईटमधून पुढे जाणारा बिबट्याला आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद करता आले. प्रवासी घेऊन नेरळकडे जात होतो. गाडी पहिल्या टर्न उतरत असताना गाडीच्या हेड लाईटमध्ये प्राणी धावत असताना दिसून आला. उतार असल्याने गाडीचा वेग चांगला होता आणि त्यामुळे काही सेकंदात बिबट्याचा समोरून आमची गाडी जाऊ लागली. बिबट्याने गार्बेट रोडकडे जाणाऱ्या कठड्यावर खाली उतरला. गाडीमध्ये पर्यटक प्रवासी असल्याने प्रवाशांची सुरक्षितता लक्षात घेऊन आम्ही खाली आलो. पुढे हा बिबटा सिमेंट कठडा चढून गार्बेट वाडीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या खाली उतरल्याचे चालकाने सांगितले. काही दिवस आधी एका पर्यटकाला त्यांच्या दुचाकी समोरून बिबट्याला रस्ता ओलांडता आढळून आला होता.

> माथेरान जंगल आणि पायथ्याशी असलेल्या जंगलात बिबट्याचे अस्तित्व दिसून येत आहे. ही बाब जंगलासाठी चांगली आहे. पण त्या प्राण्याकडून कोणालाही धोका पोहचू नये यासाठी आम्ही सर्वांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.
>
> –समीर खेडेकर
> वनक्षेत्रपाल कर्जत पश्चिम

वन विभागाने बिबट्याच्या अस्तित्वाचे पाऊलखुणा मिळतात का? हे पाहण्यासाठी माथेरान घाटात शोध मोहीम सुरू केली. तर स्थानिक टॅक्सी चालकांना बिबट्याचा वावर दिसून आल्याने वन विभागाने खबरदारी म्हणून गावोगाव गावबैठका घेण्यास सुरुवात केली आहे.

वन विभागाने बिबट्या दिसल्यानंतर काय करावे? याबाबत सूचना देणारे फलक देखील लावण्यास सुरुवात केली आहे. त्यात बिबट्याचे प्रवास ज्या बाजूने झाला तो भूभाग नेरळ माथेरान वनक्षेत्रपाल यांच्याकडील तर बिबट्याने पुढे प्रवास ज्या गार्बेट गाडीकडे जाणाऱ्या रस्त्याने केला तो भूभाग कर्जत पश्चिम वनक्षेत्रपालांच्या कडील आहे. त्यामुळे दोन्ही दुरक्षेत्र विभागाचे अधिकाऱ्यांनी जंगल परिसरात जाऊन पाहणी करण्यास सुरुवात केली आहे.

> माथेरान जंगलात धसवाडी, जुम्मापट्टी, बेडिसगाव येथे बिबट्याचे दर्शन होत असते. त्यामुळे आम्ही सतत बिबट्याचे वावर दिसून आल्यास कोणती खबरदारी घ्यावी यांची माहिती दिलेली आहे.
>
> – निलेश खेडेकर
> वनक्षेत्रपाल नेरळ माथेरान

## पीएनपी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील इतिहास विभागाकडून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली.




याप्रसंगी कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

यानंतर प्रा. नितीन कराळे, प्रा. साईनाथ पाटील यांनी देशाच्या विकासामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उल्लेखनीय कार्यावर भाष्य केले. आपल्या अध्यक्षीय वक्तव्यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील योगदान यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रसिका म्हात्रे, ग्रंथालय प्रमुख कांचन म्हात्रे, प्रा. सुजित पाटील, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.मिलिंद घाडगे यांनी केले.

## मंथन परीक्षेत हर्ष उरणमध्ये प्रथम

। चिरनेर । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाले, उरण येथील इयत्ता दुसरीचा विद्यार्थी हर्ष शेखर म्हात्रे याने राज्यस्तरीय मंथन परीक्षेत नेत्रदीपक कामगिरी करून तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तसेच तो रायगड जिल्ह्यात १९ वा आणि महाराष्ट्र राज्यात २४ व्या रँकमध्ये येऊन घवघवीत यश संपादन केले आहे. इयत्ता दुसरीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने राज्य पातळीवर चमकदार कामगिरी केल्यामुळे शाळेच्या व गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. या यशाचे श्रेय त्यांनी मार्गदर्शक प्रशांत कोळी, चैताली म्हात्रे या गुरुजनांना दिले आहे. या शिक्षकांनी घेतलेली मेहनत, नियमित सराव आणि कुटुंबियांच्या पाठिंब्यामुळे हे हर्षला यश प्राप्त झाले आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी हर्षसह या दोन्ही मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.



## पनवेल एसटी आगार समस्यांच्या विळख्यात

। उरण । प्रतिनिधी ।

पनवेल एसटी आगारातून राज्यातील कानाकोपऱ्यात एसटीची बस जाते, त्यामुळे हे एसटी आगार राज्याचे महत्त्वाचे एसटी बस आगार म्हणून ओळखले जात आहे. मात्र, राज्य शासनाच्या ढिसाळ कारभारामुळे या आगाराला अनेक समस्यांनी वेढले आहे. आजतागायत पनवेल बस आगाराच्या कामाला मुहूर्त मिळत नाही. त्यामुळे सुरतच्या धर्तीवर केव्हा उभारले जाणार असा सवाल संतप्त प्रवाशांकडून विचारला जात आहे.

या आगारात तुंबलेली गटारे, स्वच्छतेचा अभाव, अशा अनेक समस्यांच्या विळख्यात सापडले बस आगार म्हणून ओळखले जात आहे. पावसाळा तोंडावर आला आहे. डेपो खड्डेमय होत आहे. अशा आगारातून वेळेवर बस सोडल्या जात नाहीत. यावेळी प्रवाशी नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागणार आहे. प्रवाशांची होणारी गैरसोय थांबविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरत बस डेपोच्या धर्तीवर अद्ययावत पनवेल एसटी आगार बनविण्यासाठी आपले लक्ष केंद्रित करावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## श्रीकृष्ण मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील गोरेगाव कुंभारआळी येथील श्रीकृष्ण मंदिराचा जिर्णोध्दार सोहळा व उदघाटन सोहळा मंगळवारी (दि.१४) एप्रिल माजी आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमास जुबेर अब्बासी, दिलीप शेट, भूपेंद्र शेट, अरुणा शेट, चंद्रकांत गोरेगावकर, सुभाष बामणोलकर, सुनील म्हशेलकर, दिनेश उचाटे, विनोद बागडे, रोहित शिंदे, रमेश गोविलकर, नथुराम बामणोलकर, रुपाली रातवडकर, नम्रता बामणोलकर, मयूर बामणोलकर, साहिल म्हशेलकर आदींसह गोरेगाव कुंभारआळीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विविध क्षेत्रातील गुणवंतांचा गौरव

। पेण । प्रतिनिधी ।

सोबती सामाजिक संघटना व बापूसाहेब नेने फाऊंडेशन, पेण यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ समाजसेविका शुभांगी नेने यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध क्षेत्रातील १० गुणवंतांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. या उपक्रमाअंतर्गत बापूसाहेब नेने फाऊंडेशनतर्फे पाच आदर्श शिक्षक तर सोबती संघटनेतर्फे विविध क्षेत्रातील पाच आदर्श व्यक्तीमत्त्वांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास ॲड. प्रवीण ठाकूर, ॲड. बापूसाहेब नेने, राजू पिचिका, वसंत आठवले, ॲड. मंगेश नेने डॉ. नीता कदम यांच्या हस्ते गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.




सोबती संघटनेतर्फे सामाजिक क्षेत्रात चैतन्य पाटील, वैद्यकीय क्षेत्रात डॉ. बबनराव नागरगोजे, शैक्षणिक क्षेत्रात सानवी देशमुख , कला क्षेत्रात कौस्तुभ छाया भिडे व क्रीडा क्षेत्रात मिथुन मोकल यांना सन्मानित करण्यात आले.तसेच शिक्षकांमध्ये स्नेहल सावंत, अश्विनी भोंगे, महेश म्हात्रे, जमीना शिरपूरवाला व विद्या शेट्ये यांचा समावेश होता.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रास्ताविक सोबती संघटनेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांनी केले. तर पाहुण्यांची ओळख सचिव डॉ. नीता कदम यांनी करून दिली. तर सूत्रसंचानल निलेश म्हात्रे यांनी केले.

## नेरळ पाडा येथील फाटक वाहतुकीस बंद

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ गावातून जाणाऱ्या नेरळ माथेरान मिनी ट्रेन मार्गावरील नेरळ पाडा येथील फाटक गेली चार दिवस दुरुस्तीच्या कामासाठी बंद आहे. फाटक दुरुस्तीच्या कामासाठी बंद ठेवण्यात येत असताना कोणत्याही प्रकारची नोटीस अथवा सूचना वाहनचालकांना देण्यात आलेली नाही. मिनी ट्रेन नेरळ गावातून जाते आणि या २१ किलोमीटर लांबीचे मार्गावर अनेक ठिकाणी रस्ता आणि रेल्वे मार्गिका यांच्यात फाटक आहेत.



मिनी ट्रेन ये-जा करीत असताना या दोन्ही फाटकातील गेट बंद केली जात असतात. त्यामुळे मिनी ट्रेनची ये-जा सुरू असताना वाहनांची काही वेळासाठी वाहतूक बंद करणे योग्य आहे. मात्र, नेरळ पाडा भागातील फाटक हे रेल्वे अभियांत्रिकी विभागाने स्थानिक वाहनचालकांना कोणत्याही प्रकारची सूचना न देता बंद केला आहे. त्याचा मोठा फटका पाडा विभागातील स्थानिकांना बसला आहे.

रेल्वे प्रशासनाच्या अनागोंदी कारभाराबद्दल महाव्यवस्थापक यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. याविषयी महाव्यवस्थापक कोणता निर्णय घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

## राहुल उतेकरची पोलीस दलात निवड

। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील तोरंकेवाडी या गावचा राहुल उतेकर हा तरुण शेतकरी कुटुंबातील असून गेली पाच वर्षांपासून पोलीस बनण्याचे स्वप्न उराशी बांधून मेहनत करीत होता. त्याने आपल्या अपार मेहनत आणि जद्दीच्या जोरावर आपले स्वप्न पूर्ण केले. पोलीस भरतीसाठी आवश्यक असणाऱ्या मैदानी चाचणी,लेखी परीक्षेत उत्तम गुणवत्ता सिद्ध करून रायगड पोलीस दलात निवड झाली आहे. ही बातमी जेव्हा त्याच्या आईवडिलांना समजली तेव्हा त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू आले आणि खूप आनंद झाला.त्याच्या या यशाबद्दल त्याच्यावर त्याचे नातेवाईक मित्रमंडळी सामाजिक कार्यकर्ते विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



नोव्हेंबर २०२५ पासून मानधनासाठी पाठपुरावा | सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांना निवेदन

# उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टरांचे मानधन थकित

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव उपजिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी विशेषज्ञ डॉक्टरांचे मानधन अनेक महिन्यांपासून थकित असल्याने आरोग्य यंत्रणेत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर प्रश्नाकडे शासनाने तातडीने लक्ष न दिल्यास येत्या १७ एप्रिल २०२६ पासून कामबंद आंदोलन करण्याचा इशारा संबंधित डॉक्टरांनी दिला आहे.



(संग्रहित छायाचित्र)

भूलतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, शल्यचिकित्सक, अस्थिरोगतज्ञ तसेच फिजिशियन अशा विविध विशेषज्ञ शाखांतील डॉक्टर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात अंतर्गत कंत्राटी पद्धतीने पूर्णवेळ सेवा बजावत आहेत.

मात्र, नोव्हेंबर २०२५ पासून त्यांचे मानधन प्रलंबित असून वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप ते मिळालेले नाही. डॉक्टरांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकदा प्रयत्न करूनही थकीत मानधनाबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. काही डॉक्टरांचे तर ऑगस्ट २०२५ पासून मानधन थकलेले असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या परिस्थितीमुळे डॉक्टर आर्थिक अडचणीत सापडले असून त्यांच्या मनोबलावरही परिणाम होत आहे.

या संदर्भात सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांना निवेदन देत संबंधित डॉक्टरांनी स्वतः लक्ष घालून तात्काळ मानधन अदा करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, नाईलाजास्तव सर्व विशेषज्ञ डॉक्टरांना कामबंद आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.शासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने तो सोडवावा, अशी मागणी आता सर्व स्तरातून होत आहे.

### रुग्णांना बसणार आंदोलनाचा फटका

संभाव्य आंदोलनाचा सर्वाधिक फटका माणगाव व परिसरातील सर्वसामान्य रुग्णांना बसण्याची शक्यता आहे. आधीच ग्रामीण भागातील आरोग्य सेवा मर्यादित असताना, विशेषज्ञ डॉक्टरांनी काम बंद केल्यास रुग्णसेवेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. दरम्यान, या निवेदनावर विविध विशेषज्ञ डॉक्टरांच्या स्वाक्षऱ्या असून त्यांनी एकमुखाने आपल्या हक्काच्या मानधनासाठी लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# कळंबमध्ये शासकीय दाखल्यांसाठी गर्दी



। नेरळ । प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात कळंब परिसरातील आदिवासी लोकांनी मोठा सहभाग दिसून आला. तब्बल ८७० लाभार्थ्यांनी विविध प्रकारचे शासकीय दाखले मिळविण्यासाठी गर्दी केली होती. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरामुळे लाभार्थींचे समाधान होत असल्याचा दावा तालुक्याचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी केला. यावेळी भूमी अभिलेखाकडून गावठाण हद्द मोजणी कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी रेश्मा जोशी, भूमिअभिलेख उप अधीक्षक नितीन आटाळे, तालुका पुरवठा अधिकारी दळवी तसेच माजी सरपंच आवेश जूवारी, रविंद्र झांजे यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.

या शिबिरामध्ये लाभार्थींना रहिवासी दाखले, उत्पन्नाचे दाखले, नॉन क्रिमिनल दाखले, तसेच नवीन रेशन कार्ड, दुय्यम रेशन कार्ड, देण्यात आले. तसेच संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्य योजनेचा लाभ, नवीन आधारकार्ड दुरुस्ती सातबारा दुरुस्ती करण्याचे काम करण्यात आले. या शिबिरात कळंब भागातील लाभार्थ्यांना दाखल्यांचे वाटप करण्यात आले तर लाभार्थ्यांकडून विविध प्रकारच्या दाखल्यांसाठी ८७० अर्ज दाखल झाले. शिबीर यशस्वी होण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी निलेश पवार, आकाश निफाळे, रणजीत कोळेकर, शशिकांत हुशगुंडे, वंदना कांबळे, मोहिनी भडांगे यांचा सहभाग होता.



# माथेरानमध्ये नेत्र तपासणी शिबीर

**कर्जत** : माथेरानमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित मोफत शस्त्रक्रिया शिबीर डॉ. हळपुरकर व माथेरान डॉ बाबासाहेब आंबेडकर जंयती महोत्सव समितीच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी सचिन दाभेकर यांच्या सहकार्यातून मोफत नेत्र तपासणी, मोफत मोतीबिंदू, मोफत चश्मे वाटप करण्यात आले. या शिबीरात एकूण १४२ नागरिकांनी लाभ घेतला त्यातील १३ नागरिकांना पुढील तपासणी करण्यात येणार असून तसेच १८ नागरिकांची शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे दाभेकर यांनी सांगितले. यावेळी ८३ नागरिकांना चश्मे देखील वाटप करण्यात आले. या शिबीरात डॉ. अक्षता गायकवाड, मैथाली मराठे, नितीन कांदळगावकर,यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी सिताराम कुंभार, प्रवीण गायकवाड, श्रेयस गायकवाड, शुभम गायकवाड, विजय राणे, चंद्रकांत शेट्टे, अनिल गायकवाड, मयुरेश हातोळे आदी उपस्थित होते.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक किसन नानू शिनारे वगैरे यांचे कडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ३५ | ७ | १.७१.०० पैकी सुमारे ०.७४.०० | १.०३ |

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर, पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १६/०४/२०२६

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता. दिनकर-निमकर अपार्टमेंट
बाजारपेठ कर्जत, ता.कर्जत,
जि. रायगड-४१०२०१.

## विद्यानंद ओव्हाळ, अजय कदम यांचा सन्मान

। वेनगाव । प्रतिनिधी ।

रायगड प्रेस क्लबच्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष समारंभात कर्जत प्रेस क्लबचे पत्रकार विद्यानंद ओव्हाळ आणि माथेरान प्रेस क्लबचे पत्रकार अजय कदम यांचा मानाचा सन्मान करण्यात आला. पत्रकारितेतील योगदानाबरोबरच सामाजिक प्रश्नावर सातत्याने आवाज उठविणाऱ्या या दोन्ही पत्रकारांच्या कार्याची दखल घेत हा गौरव प्रदान करण्यात आला.या कार्यक्रमात कर्जत प्रेस क्लबचे पत्रकार विद्यानंद ओव्हाळ यांना जनार्दन पाटील स्मृती शोध पत्रकारिता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तर माथेरान प्रेस क्लबचे पत्रकार अजय कदम यांना रायगड प्रेस क्लब विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. हा सन्मान राज्याचे मंत्री नितेश राणे, आ. प्रवीण दरेकर एस. एम. देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# बापूसाहेब देशपांडे विद्या संकुलात महामानवाला अभिवादन



। नागोठणे । प्रतिनिधी ।

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यसंकुलातील श्रीमती गुलाबबाई रामनिवास अग्रवाल विद्यामंदिर व सरेमल प्रतापमल जैन जूनियर कॉलेज येथे विद्यालयाचे प्राचार्य देविदास पवार यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य देविदास पवार यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांची १३५ वी जयंती बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलात साजरी केली गेली. यावेळी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या संदेशाचा प्रचार केला गेला. डॉ. बाबासाहेबांचे विचार, समता, बंधुता आणि न्यायाचे मूल्य यांचा प्रसार करणे हे या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमाच्या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक देविदास पवार यांच्यासह वरिष्ठ संतोष गोळे, नेताजी गायकवाड, रमेश जेडगे, भीमराव शिंदे, अनिल तिरमले, अबेसिंग गावित यांच्यासह सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्यय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - वडवली, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.चौ.मी. | रुपये | पैसे |
| १) श्री. अनिल नारायण लांबे<br>२) श्री. अनंत संभाजी कडव<br>३) श्री. ऋषीकेश अरुण जोशी<br>४) श्री. विजय शेषराव खाडे | ३९ | ६ | ०-११-७० | ० | ६२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत
नगरपालिका कार्यालयाशेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. निलेश दामु मुंढे**
दिनांक : १६/०४/२०२६
मो. नं. ८४४६८६९६७१
ई मेल: nileshmundhe029@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत श्री. अनंता गणु पवार यांच्या मालकी हक्काच्या असून सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांबरोबर खरेदी देण्याच्या हेतुने बोलणी करीत आहे. सदर मिळकतीत इतर कोणाचाही विक्री, देवाण-घेवाण, गहाण, वारसा, ताबा, खरेदीखत, बक्षीस, मृत्यूपत्र वाटपपत्र वा इतर कोणत्याही प्रकारचा करारनामा वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास व मिळकत विकण्यास कोणाचीही हरकत असल्यास त्याच्या पृष्ट्यर्थ सर्व कागदोपत्री पुराव्यासोबत खालील पत्त्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत लेखी सुचित करणे आवश्यक आहे. जर अशाप्रकारची कोणतीही लेखी हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर खालील नमुद केलेल्या मिळकतीशी कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल व ज्याचा कोणाचा कोणत्याही प्रकारे तथाकथित हक्क हितसंबंध इ. आहे तो जाणीवपुर्वक सोडून दिला आहे. असे समजून आमचे आशिल सदर मिळकतींचा प्रस्तुतची मुदतीनंतर सदर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत हरकत असल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही व आमचे अशिल सदर खालील नमुद केलेल्या मिळकतींचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे-वणी तालुका- खालापुर जिल्हा-रायगड येथील गट नं.- १९३, क्षेत्र १-०७-०० (हे-आर), आकार ०.५३ (रू-पै) अशी जमिन मिळकत.

दिनांक :-१६/०४/२०२६
स्थळ :- खोपोली

**सौ. वैशाली सुनिल कराळे**
ॲडव्होकेट.
फ्लॅट नं.-५, वैभव समृद्धी
काटरंग, खोपोली,
ता.-खालापूर, जि.-रायगड. ४१०२०३



# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बनोटी या शाळेत मंगळवारी (दि.१४) एप्रिल रोजी शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी शैक्षणिक साहित्य लहु म्हात्रे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी म्हात्रे यांनी डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावर विविध उदाहरणे देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी पालक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे किहिम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. शैलेश शशिकांत विलणकर २) सौ. वैभवी शैलेश विलणकर यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर बिनशेती मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| किहिम ता. अलिबाग जि. रायगड | २१६/१ | एकूण क्षेत्र ३१३.३०.०० | ३१३३.०० |

वर नमुद मिळकतीपैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे क्षेत्र ३.०५.०० आर. चौ.मी.,आकार ३०.५० रू. पैसे

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करारमदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १६/०४/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे बागमांडले, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट क्र. व उपविभाग ३४३ एकूण क्षेत्र ०१.३६.००, पैकी श्री. कौस्तुभ सुभाष शेवाळे, रा. बागमांडला, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांच्या मालकीच्या क्षेत्र ००.४५.४० आकार ०.२० इतक्या क्षेत्राची मिळकत विद्यमान मालकांकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांसोबत केलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबे-कब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे.

वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा, पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने ) खाली सही करणार (वकील) यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्याची ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : १५/०४/२०२६
कार्यालयीन पत्ता
रा. महेश्वर आळी, श्रीवर्धन,
ता. श्रीवर्धन, जि. रायगड

सही/-
**अतुल अरविंद चौगुले**
B.L.S. LL.B
खरेदीदाराचे वकील

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक रणजित प्रभाकर राणे यांचेकडून सदर मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकाचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकाच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्याला पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्ती/संस्थेस सदर मिळकत किंवा त्यातील कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणताही दावा असल्यास त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१ येथे संबंधित कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतांसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत ही विद्यमान मालकाच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा अलिबाग यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-आवास, तालुका-अलिबाग जिल्हा-रायगड स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ४५२, एकूण क्षेत्र ०१.०३.४० (हे.आर.चौ.मी) पैकी क्षेत्र ००.२०.५० (हे.आर. चौ.मी) आकार ०५.८१ पै. ज्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेतः

उत्तरेस आणि त्या दिशेने : गट नं.४५२ पैकी उर्वरीत मिळकत
दक्षिणेस आणि त्या दिशेने : गट नं.४७६ व ४६९ या मिळकती
पूर्वेस आणि त्या दिशेने : गट नं.४५२ पैकी उर्वरित मिळकत
पश्चिमेस आणि त्या दिशेने : गट नं.४७६ ही मिळकत व गाव रस्ता
ठिकाण : अलिबाग
दिनांक : १६.०४.२०२६

**झुंजारराव आणि कं.करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कडाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक कैलास त्र्यंबक बच्छाव यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १०० | ४/ड | ०.१८.१० | ०.१४ |

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर, पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १६/०४/२०२६

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता. दिनकर-निमकर अपार्टमेंट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१.

## दि.१५/०४/२०२६ — जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे दहिवली तर्फे नीड ता. कर्जत जि. रायगड येथील

| सिटी सर्व्हे क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. | सत्ता प्रकार |
|---|---|---|
| ६७० | ५७७-७० | क |

ची बिनशेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करावयाची ठरविले आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडुन आलेला आहे.

तरी उपरोक्त बिनशेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्तखत, खरेदीखत वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त बिनशेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तीचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त बिनशेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.
येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. वैभव राजेंद्र कानिटकर**
रा.गुंडगे, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९१७५१२०५५९

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की खालील वर्णन केलेली जमीन मिळकत सदर जमीनीचे मालक श्री. संजय भगवतीलाल कोठारी यांचे मालकीची व त्यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटीची ७/१२ सदरी त्यांचे नावे असलेली भोगवटादार वर्ग १ ची मिळकत जमिन मौजे-सावरगाव, तालुका कर्जत जिल्हा-रायगड या गावी आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-

**मौजे सावरगाव, तालुका-कर्जत जिल्हा रायगड येथील मिळकतींचे वर्णन**

| सर्व्हे/हिस्सा नंबर | क्षेत्र - हे.आर.पॉ | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ६३/१८/ब | एकूण क्षेत्र-०-४५-०० या पैकी खरेदी दिलेले क्षेत्र -०-२५-०० | ३-९१ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत झाडझाडोऱ्या सुद्धा सर्व हक्कहितसंबंधासह सदर जमीनीचे मालक यांचे कडुन खालील सही करणार यांनी विकत घेण्यांचे ठरले असून त्याबाबत बयाणा पावती झालेली आहे. सदर जमीन मालक यांनी सदर वर वर्णन केलेली जमीन दुसरे कोणास कोणत्याही हक्काने म्हणजे साठेकरार, बयाणा पावती, हक्कसोड पत्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, गहाण दान बक्षिस खरेदी वगैरे दिलेली नाही. अगर दुसरे कोणास कोणत्याही हक्कांने दिलेली नाही. अगर तोंडी अगर लेखी करार केलेला नाही. जर करता सदर मिळकतीबाबत कोणाचीही कुठल्याही प्रकारची तकार हरकत असल्यांस त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ०७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनी लेखी पुरावे सादर करावेत. जर करीता सदर मुदतीस कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहित अशी समजुन सदर मिळकतीचे रजिस्टर खरेदी खत केले जाईल. मागाहुन येणाऱ्या तक्रारीस व हरकतीस खालीलसही करणार हे जबाबदार राहणार नाही.
करीता सदर जाहिर नोटीसीने कळवित आहे.

तारीख :- १५-०४-२०२६

सही
**श्री.आदित्य विजयबहादुर सिंह**
रा-अखिलेश कुंज, रूम नंबर ४०१
विक्रोळी पूर्व मुंबई - ४०००८३
मो. ७२७६०९३१३३

## जाहीर नोटीस — दिनांक १५/०४/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे टेंभरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील

| मालकाचे नाव | सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| श्री. अभिषेक किशोर आसवले वगैरे | ६५ | ५ | ०-०६-३० | ०-१७ |
| | ६५ | ३/ब | ०-२४-०० | ०-६७ |
| | ६५ | ४ | ०-३७-०० पैकी ०-३०-०० | ०-९४ |

च्या शेतजमीन मिळकती विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाच्या ठरविलेल्या आहेत. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. मातोश्री निवास आवळस,
ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस

तमाम नागरीकांना कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत ही आमचे अशिल श्री. नरेंद्र उर्फ रविंद्र बारकू भोईर यांचे वाडवडलोपार्जित एकत्र कुंटुंबाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे बोरीवली, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर.चौ.मी | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २३ | ३ | १-२९-०० | ०-६० |

वरील मिळकती संदर्भात आमचे अशिलाची आत्या श्रीम. आनंदीबाई उर्फ सुंदराबाई हरीचंद्र कडव हिने कर्जत मा. दिवाणी न्यायालयात रे. मु.नं. १६/२०११ हा दावा दाखल केला होता. सदर दाव्यात तडजोड होवून सदर मिळकती पैकी क्षेत्र ०-४०-०० हे. आर. चौ.मी इतके क्षेत्र अटी व शर्तीवर श्रीम. संदराबाई हरीचंद्र कडव हिला खरेदीखत दस्त क्र. १५०/२०१५ अन्वये दिलेले होते. या बदल्यामध्ये तिने मौजे बोरीवली, ता. कर्जत, जि. रायड येथील सामाईक मिळकतीतून आपला हक्क सोडून हक्कसोडपत्र नोंदणीकृत देण्याचे होते. परंतु आता त्यांनी सदर हक्कसोडपत्र ठरल्याप्रमाणे करून देत नाही. त्यामुळे सदर झालेले खरेदीखत अटी व शर्तीनुसार असल्याने व तसा दस्तात नमूद असल्याने सदर खरेदीखत रद्द झालेले आहे. त्यामुळे सदर मिळकतीत कुणीही कोणताही करार मदार खरेदीखत करू नये सदर खरेदीखत केल्यास ते आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही व आपल्याला सदर प्रकरणात माहिती असून खरेदीखत केल्याने सदर खरेदीखत कायदेशीर होणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. १६/०४/२०२६

**ॲड. निलेश रखमाजी पादीर**
मोबा. नं.९७६७६३७१००/९२७२५६२१५८.

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु.पो.नेरळ (मोहाचीवाडी),
ता.कर्जत, जि.रायगड
मो.-९८५०७६७५६८

**महानगर गॅस लिमिटेड**
**सीआयएन:** एल४०२००एमएच१९९५पीएलसी०८८१३३
१८०१–०२, १८वा माळा, ए विंग, परिणी क्रेसेन्झो, सी३८ आणि सी३९, ब्लॉक–जी, वान्द्रे-कुर्ला संकुल, एमसीए समोर, वान्द्रे (पूर्व), मुंबई ४०००५१, महाराष्ट्र
MAHANAGAR GAS

**पॅनेलवर समाविष्ट होण्याची सूचना: पीएनजी कामासाठी प्लंबर / गॅस तंत्रज्ञ तात्काळ आवश्यक**

महानगर गॅस लिमिटेड (एमजीएल) मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगड, लातूर, उस्मानाबाद, रत्नागिरी, चित्रदुर्ग आणि दावणगेरे येथे पाईप नॅचरल गॅस (पीएनजी) आणि कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस (सीएनजी) चे वितरण करते.

जे कंत्राटदार निवासी इमारतींमध्ये जीआय पाइपिंग आणि स्वयंपाकघरातील कामांसाठी प्लंबर / किंवा एलपीजी स्टोव्हचे पीएनजी स्टोव्हमध्ये रूपांतर करण्यासाठी गॅस तंत्रज्ञ तातडीने पुरवू शकतील, त्यांनी १७ एप्रिल २०२६ ते २४ एप्रिल २०२६ या कालावधीत, सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत, वर नमूद केलेल्या पत्त्यावर भेट द्यावी.

कोणत्याही प्रश्नांसाठी, कृपया या ई–मेलवर संपर्क साधा:
**erande.sanket@mahanagargas.com; asingh@mahanagargas.com**

सही/–
वरिष्ठ उपाध्यक्ष (सी अँड पी)

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने – नविन डिझाईन्स
मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# वेंगसरकर मैदानाची दयनीय अवस्था

## • पालिकेचा खेळाडूंच्या जीवाशी खेळ • प्रशासनाच्या निष्काळजीपणावर संताप

। पनवेल । दिपक घरत ।

पनवेल पालिकेच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या शहरातील दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमीतील मैदानाची अत्यंत दयनीय अवस्था समोर आली आहे. त्यामुळे खेळाडूंच्या सुरक्षेसह आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. एकीकडे अकादमीचे नाव मोठे, तर दुसरीकडे मैदानाची दयनीय अवस्था झाली आहे.



स्थानिक क्रिकेट टॅलेंटला योग्य प्रशिक्षण आणि प्लॅटफॉर्म देण्यासाठी नवीन पनवेल सेक्टर ११ येथील राजीव गांधी मैदानत कोट्यवधी रुपये खर्च करून दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमी आणि मैदान विकसित करण्यात आले आहे. ही अकॅडमी भारताचे माजी क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांच्या दिलीप वेंगसरकर फॉऊंडेशन मार्फत चालवली जाते. या करिता २०२२ मध्ये पनवेल महानगरपालिका आणि वेंगसरकर फाऊंडेशन यांच्यात करार झाला होता. त्यामुळे ही क्रिकेट अकॅडमी पनवेलसह नवी मुंबई परिसरातील एक महत्त्वाची क्रीडा सुविधा मानली जाते. परंतु, सध्या या मैदानाची अत्यंत दयनीय अवस्था समोर आली आहे. या मैदानावर ठिकठिकाणी गवत पूर्णपणे नष्ट झाले असून मोठ्या प्रमाणात कोरडी माती दिसून येत आहे. परिणामी संपूर्ण मैदान असमतोल झाले आहे. सरावादरम्यान चेंडूचा बाऊन्स अनियमित होत असून फलंदाजांना मोठा धोका निर्माण होत आहे. फील्डिंग करताना खेळाडूंना जखमी होण्याचा धोका वाढला असून, एखादा गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे खेळाडू व पालकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत, 'फक्त नावापुरती अकादमी नको, दर्जेदार सुविधा द्या' अशी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. तसेच, काट्यवधी रुपये खर्च करूनही मैदानाची देखभाल होत नाही. याकडे संबंधित प्रशासन मात्र डोळेझाक करत असल्याचा आरोप पालकांकडून होत आहे. एखादा मोठा अपघात झाल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. त्यामुळे तातडीने मैदानाचे सपाटीकरण, गवत लागवड व देखभाल करण्याची मागणी खेळाडूंचे पालक करत आहेत.

### मैदानाची जबाबदारी कोणाकडे?

पनवेलमधील दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकॅडमीच्या मैदानाची दयनीय अवस्था समोर आली आहे. या प्रकल्पात पनवेल पालिका आणि दिलीप वेंगसरकर फॉऊंडेशन या दोन संस्था सहभागी आहेत. पालिकेकडे मैदान व इन्फ्रास्ट्रक्चरची मालकी असून मोठी दुरुस्ती, विकासकामे आणि एकूण प्रशासनाची जबाबदारी आहे. तर, फाऊंडेशनकडे अकॅडमीचे संचालन, प्रशिक्षण, खेळाडू व्यवस्थापन आणि रोजची देखभाल सोपवण्यात आली आहे. असे असतानाही या मैदानाकडे संबंधितांकडून दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे या मैदानाची जबाबदारी नेमकी कोणाकडे आहे, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

### धोकादायक खेळपट्टी

खेळपट्टीवर गवत फार कमी आणि असमान आहे. माती कोरडी व तडकलेली दिसते. पृष्ठभाग खडबडीत आणि यूनिवेन आहे. काही ठिकाणी हार्ड पॅच आणि सॉफ्ट पॅच एकत्र दिसतात. परिणामी चेंडू अनियमित उसळी घेत असल्याने गोलंदाजाला अनपेक्षित मूव्हमेंट मिळते. त्यामुळे फलंदाजाला इजा होण्याचा धोका वाढत असल्याचे मत जानकरांनी व्यक्त केले आहे.

## निवडक



### मैत्री, रोहा तालुका चषकाचे उद्घाटन

**कोलाड :** प्रमोद अनंत म्हसकर सामाजिक प्रतिष्ठान पुरस्कृत मैत्री चषक तसेच रोहा तालुका असो. चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन संभे येथील प्रांगणात करण्यात आले आहे. ही क्रिकेट स्पर्धा दि.१४ ते १८ एप्रिल रोजी विद्युत प्रकाशझोतात पार पडणार आहे. या स्पर्धे चा उद्घाटन सोहळा मंगळवारी (दि.१४) रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष तथा रायगड प्रीमियम लिगचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर व सामाजिक कार्यकर्ते प्रमोद म्हसकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर रायगड जिल्हा क्रिकेट ग्रामीणचे अध्यक्ष राकेश गायकवाड, पंचायत समिती सदस्य सुरेश मगर, नगरसेवक सचिन चालके, सरपंच महेंद्र पोटफोडे, मनोज शिर्के, तालुका कुणबी युवक अध्यक्ष अनंत थिटे, सुरेश महाबळे, समीर महाबळे, राजेश सानप, राजेश कदम, अमित मोहिते, दर्शन तेलंगे, संतोष बाईत यांच्यासह रोहा तालुक्यातील तसेच कोलाड विभागातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील असंख्य कार्यकर्ते आणि क्रिकेट प्रेमी उपस्थित होते.



### दुखापतीमुळ रोहित शर्माची माघार

**मुंबई :** इंडियन प्रीमिअर लीगमध्ये मुंबई इंडियन्सची कामगिरी फार चांगली झालेली नाही आणि त्यात आता त्यांना आणखी एक मोठा धक्का बसला आहे. मुंबईने आयपीएलमध्ये ४ सामन्यांत ३ पराभव पत्करले आहेत. सलामीच्या सामन्यात कोलकाता नाइट रायडर्सवर विजय मिळवल्याने त्यांना सलग तीन सामने गमवावे लागले. मागील सामन्यात हिटमॅन रोहित शर्माने दुखापतीमुळे मैदान सोडले होते आणि तो पुढील सामन्यात खेळणार की नाही, ही चिंता होती. हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे रोहित पुढचे २ सामने खेळू शकणार नाही. रविवारी दुखपात झाल्यानंतर रोहितला सोमवारी स्कॅनिंगसाठी नेण्यात आले आणि तो मंगळवारी संघाच्या सराव सत्रातही सहभागी झाला नव्हता. त्यामुळे रोहितच्या गैरहजेरीमध्ये मुंबईला बॅटिंग कॉम्बिनेशनमध्ये बदल करावे लागणार आहेत. मुंबईचे पुढचे दोन सामने १६ एप्रिलला पंजाबविरुद्ध आणि २० एप्रिलला गुजरातविरुद्ध होणार आहेत. गुजरातविरुद्धच्या सामन्यात रोहित खेळण्याची शक्यता आहे.




### संजु सॅमसनचा आयसीसीकडून सन्मान

**दुबई :** सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात भारतीय क्रिकेट संघाने टी-२० विश्वकरंडक पटकावण्याची किमया करून दाखवली. सलामी फलंदाज संजू सॅमसन याने अखेरच्या तीन लढतींत अर्धशतकी खेळी साकारत मोलाचा वाटा उचलला. आयसीसीकडून त्याने केलेल्या देदीप्यमान कामगिरीची पोचपावती मिळाली आहे. मार्च महिन्यातील सर्वोत्तम पुरुष क्रिकेटपटू म्हणून त्याच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. आयसीसीच्या मासिक पुरस्कारासाठी संजू सॅमसनच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आल्यानंतर तो भावुक झाला. याप्रसंगी तो म्हणाला की, आयसीसी पुरस्कार जिंकणे ही एक अविश्वसनीय भावना आहे. विशेषतः माझ्या क्रिकेट प्रवासातील सर्वात अविस्मरणीय टप्प्यात हा पुरस्कार मिळाल्याचा आनंद काही औरच आहे. टी-२० विश्वकरंडक पटकावणाऱ्या भारतीय संघाचा सदस्य असणे हे स्वप्न साकार होण्यासारखेच आहे.

### कर्णधार अजिंक्य रहाणे दुहेरी कात्रीत

**कोलकाता :** इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेत अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वातील कोलकाता नाईट रायडर्स संघ सध्या संघर्ष करताना दिसत आहे. पहिल्या ५ सामन्यानंतरही अद्याप कोलकाताने एकही सामना जिंकलेला नाही. मंगळवारी (दि.१४) झालेल्या सामन्यात कोलकाताला चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध ३२ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. ५ सामन्यांतील कोलकाताचा हा चौथा पराभव होता. त्यांचा एक सामना पावसामुळे रद्द झाला आहे. आता चेन्नई विरूद्धच्या पराभवानंतर अजिंक्य रहाणे दुहेरी कात्रीत सापडला असून त्याच्यावर बीसीसीआयकडूनही कारवाई झाली आहे. या सामन्यानंतर रहाणेवर दंडात्मक कारवाई झाली, याची माहिती आयपीएलकडून देण्यात आली आहे. अजिंक्य रहाणेला १२ लाखांचा दंड झाला आहे. कोलकाता संघाने चेन्नईविरुद्धच्या सामन्यात निर्धारित वेळेत २० षटके पूर्ण न केल्याने कर्णधार या नात्याने रहाणेला दंड ठोठावण्यात आला आहे.

### महाराष्ट्राचा सौराष्ट्र संघावर विजय

**पुणे :** मुंबईत सुरू असलेल्या १७ वर्षांखालील मुलींच्या गटाच्या पश्चिम विभागीय एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत ईश्वरी अवसरेची नाबाद अर्धशतकी खेळी आणि अक्षया जाधवच्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर महाराष्ट्राने सौराष्ट्र संघावर आठ गडी राखून विजय प्राप्त केला. त्यामुळे महाराष्ट्राचा हा सलग तिसरा विजय ठरला आहे. मुंबईत झालेल्या या लढतीत प्रथम फलंदाजी करणाऱ्या सौराष्ट्राचा डाव ३७ षटकांत १३६ धावांतच रोखला गेला तर महाराष्ट्राने विजयी लक्ष्य १८.४ षटकांत २ गडींच्या मोबदल्यात पार केले. सौराष्ट्र संघाच्या अँजेल कांगड, रिती पारेख व ध्रुवी भटासनने संघाचा डाव सावरला. अक्षया जाधवने ३ गडी बाद केले. प्रत्यूत्तर देताना महाराष्ट्राची सलामीची फलंदाज ईश्वरी अवसरेने आपला धडाका कायम राखताना ४२ चेंडूंत १४ चौकार व १ षटकारासह ७४ धावा केल्या तिने सिमरन दबासच्या साथीत पहिल्या बळीकरिता ८८ धावांची सलामी दिली.

## उरणमध्ये खेळाडूंसाठी मार्गदर्शन शिबीर

। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।

उरण क्रिकेट पंच असो. च्यावतीने म्हातावलीतील मातोश्री हॉलमध्ये दि.२४ मे रोजी एमसीसीने नवीन बदलेल्या नियमांच्या संदर्भात मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळात होणार आहे. क्रिकेट खेळतील नवीन बदलेल्या नियमांबरोबर आपल्याला क्रिकेट स्पर्धेत पडणाऱ्या प्रश्नांनाची उत्तरे देखील या शिबिराच्या माध्यमातून देण्यात येणार आहेत. या शिबिरासाठी मार्गदर्शक म्हणून बीसीसीआयचे विद्यमान पंच तथा माजी रणजीपटू हर्षद रावले, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे पंच राजन कसबे व क्रिकेट नियमांचे तज्ज्ञ नयन कट्टा हे मार्गदर्शन करणार आहेत. एमसीसीच्या नवीन बदलेल्या नियमांमध्ये ७ नियम हे नयन कट्टा यांनी सुचविलेले असून ते एमसीसीच्यावतीने २०२६ च्या आवृत्तित अंतर्भूत करण्यात आले आहेत. तरी रायगड जिल्ह्यातील सर्व क्रिकेट खेळाडू, प्रशिक्षक, पंच, गुणलेखक, आयोजक, समालोचक यांनी आपले क्रिकेट नियमांची संपूर्ण माहिती मिळावी म्हणून या शिबिरात सहभाग घ्यावा. तसेच टेनिस बॉल, लेदर बॉल खेळणाऱ्या प्रत्येक संघाच्या कमीत कमी दोन खेळाडूंनी तरी या प्रशिक्षण शिबिरात सहभाग घ्यावा. तसेच, या शिबिरामध्ये सहभाग घेण्यासाठी ठराविक प्रवेश फी भरून १० मेपर्यंत नाव नोंदविणे गरजेचे आहे.

## एसपीजी टि-२० स्पर्धेचे आयोजन

### राज ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन

। मुंबई । क्रीडा प्रतिनिधी ।

आपल्या असामान्य खेळाच्या बळावर आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रिकेटमध्ये देदिप्यमान अशी कामगिरी करणाऱ्या महान खेळाडूंपैकी स्व. विजय मांजरेकर आणि रमाकांत देसाई यांच्या कामगिरीचा गौरव म्हणून एसपीजी टि-२० स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा दादरमधील शिवाजी पार्क जिमखाना येथे दि.१५ ते १८ एप्रिल यादरम्यान आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेत क्रिकेट क्लब ऑफ इंडिया, डी.वाय. पाटील स्पोर्ट्स अकादमी, कर्नाटक स्पोर्ट्स क्लब आणि इस्लाम जिमखाना या संघानी विजयी सलामी दिली.



या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा शिवाजी पार्क जिमखान्याच्या मैदानावर बुधवारी (दि.१५) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच, राज ठाकरे यांच्या हस्ते शिवाजी पार्क जिमखान्याविषयीच्या मान्यवरांच्या आठवणी असलेल्या 'खाण रत्नां'ची या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना एसपीजीने २० षटकांत ७ खेळाडू गमावून १८९ धावा केल्या. रझा मिर्झाने ४२, आशय दुबेने ५३ आणि दशरथ चव्हाणने ३० धावा केल्या. कर्नाटक स्पोर्टस संघासाठी प्रथमेश डाके आणि वैभव माळीने प्रत्येकी २ बळी घेतले. कर्नाटक स्पोर्ट्सच्या सलामीचा फलंदाज अनिष चौधरीच्या ७१ आणि गौरीश जाधवच्या नाबाद ४६ धावांच्या जोरावर संघाने १८.३ षटकांत ४ खेळाडू गमावून १९३ धावा करत सामना जिंकला. दुसऱ्या सामन्यात बेंगॉल क्रिकेट क्लबवर व्हिक्टरी क्रिकेट क्लब आणि डी.वाय. पाटील स्पोर्ट्स अकादमी संघांत खेळला गेला. या सामन्यात व्हिक्टरी संघाचा सलामीचा फलंदाज जय बिस्तने स्पर्धेतील पहिले शतक झळकावूनही त्याच्या संघाला डी. वाय. पाटील संघाकडून ६ खेळाडू राखून पराभव स्विकारावा लागला. मात्र, या स्पर्धेतील गतविजेता पार्कोफिन क्रिकेटर्स आणि यजमान शिवाजी पार्क जिमखाना संघांचे आव्हान पहिल्या फेरीतच संपुष्टात आले. या स्पर्धेला आयडीबीआय बँक आणि एलआयसीचा पुरस्कार लाभला आहे.

## कर्नाळा स्पोर्ट्सच्या महिलांची बाजी




। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील ओमकार क्रीडा मंडळाच्यावतीने कै. पूर्वा भगत स्मृती चषक, महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कै. पूर्वा भगत हीने ओमकार वेश्वी महिला कबड्डी संघात एक वेगळे स्थान निर्माण केले होते. जिल्ह्यातील महिला चढाई पटूंना तिचा दरारा कायम राहिला. त्यामुळे तिच्या स्मरणार्थ या कबड्डी स्पर्धेचे आयोजन केल्याचे अध्यक्ष प्रफुल्ल पाटील यांनी सांगितले. या स्पर्धेचे उद्घाटन कै. पूर्वा भगत हिचे वडील राजेंद्र भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ओमकार क्रीडा मंडळाचे अध्यक्ष प्रफुल्ल पाटील, उपाध्यक्ष जितेंद्र शेळके, सचिव गिरीश शेळके व ओमकार क्रीडा मंडळाचे सदस्य उपस्थित होते. या स्पर्धेत पनवेलच्या कर्नाळा स्पोर्ट्स संघाने अंतिम सामन्यात पनवेल स्पोर्ट्स संघावर ४ गुणांनी मात करीत अंतिम विजय पटकवला. तर, किहिमचा भिल्लेश्वर संघ तृतीय आणि पेणचा ऋतिक्षा स्पोर्ट्स संघाला चतुर्थ क्रमांकावर समाधान मानावे लागले. तसेच, कर्नाळा स्पोर्ट्सच्या तेजा सकपाळ हिने स्पर्धेतील सर्वोत्कृष्ठ खेळाडूचा मान पटकवला. तर, उत्कृष्ठ चढाई भिल्लेश्वरच्या चैत्राली म्हात्रे, उत्कृष्ठ पकड पनवेल स्पोर्ट्सच्या पायल निगडे आणि पब्लिक हिरो म्हणून ऋतिक्षा संघाच्या मलिका शिंदे यांना गौरविण्यात आले. वेश्वीच्या उपसरपंच आरती पाटील, जुई शेळके, रुपाली गुरव, प्राची राऊळ, सुप्रिया राऊळ, मनाली राऊळ, रोहिणी राऊळ, अंकिता शेळके, संजीवनी गोळे, रीमा ठाकूर, विदुला ठाकूर, नम्रता शेळके यांच्या हस्ते विजेत्यांना गौरविण्यात आले.

## अधिकृत पंच बनण्याची संधी

। मुंबई । प्रतिनिधी ।

अचूक नजर, नियमांची सखोल जाण आणि धाडसी निर्णयक्षमता असणाऱ्यांसाठी आता मोठी संधी उपलब्ध झाली आहे. महा इनडोअर क्रिकेट असो.तर्फे जिल्हा पंच प्रमाणपत्र कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, दि.१ मे रोजी ही परीक्षा होणार असून, दि.३ मे रोजी निकाल जाहीर होणार आहेत. त्यासाठी दि.१३ ते १८ एप्रिलदरम्यान नोंदणी करणाऱ्यांना ५०० रुपये सवलतीचे शुल्क लागू आहे. तर, दि.१९ ते २५ एप्रिलदरम्यान शुल्क १ हजार रुपये असेल. तसेच, दि.२६ एप्रिल रोजी अभ्यासक्रम ऑनलाईन उपलब्ध करून दिला जाणार आहे. दि.२७ ते ३० एप्रिलदरम्यान दररोज रात्री ८.३० वाजता ऑनलाईन सत्रांद्वारे पंच परीक्षेचे बारकावे शिकवले जातील.



## व्यावसायिक कबड्डी स्पर्धेचा थरार

। मुंबई । प्रतिनिधी ।

ओम् ज्ञानदीप क्रीडा मंडळातर्फे राज्यस्तरीय व्यावसायिक पुरुष गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन मुंबईतील आदर्श नगर येथील वरळी स्पोर्टस् क्लबच्या मॅट मैदानावर करण्यात आले होते. या हंगामातील पहिल्या पुरुष व्यावसायिक गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत युवा पलटन, मध्य रेल्वे, एच.ए.एल. नाशिक यांनी विजयी सलामी दिली. 'अ' गटातील पहिल्या साखळी सामन्यात युवा पलटनने स्वामी समर्थ स्पोर्टस्चा ५७-२६ असा सहज पराभव केला. समोरच्या संघाचा अंदाज घेत खेळ करणाऱ्या युवा पलटनने विश्रांतीला २७-१६ अशी आघाडी घेतली होती. विश्रांतीनंतर मात्र सामना २९ गुणांच्या फरकाने खिशात टाकला. मध्य रेल्वेने 'क' गटात रूपाली ज्वेलर्सचा ४६-१७ असा पाडाव केला. पूर्वार्धात आक्रमक खेळ करीत २७-१७ अशी आघाडी घेणाऱ्या रेल्वेने उत्तरार्धात सावध खेळ करीत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. नाशिकच्या एच.ए.एल. ने 'इ' गटात जे.जे. रुग्णालयवर ४३-३१ असा विजय मिळविला.

### चरई येथील भव्य पटांगणार आयोजन | पुरूष गटातील तीनही सामने अतिटतिचे

## ठाण्यात रंगतोय कबड्डीचा थरार

। ठाणे । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. व ठाणे जिल्हा कबड्डी असो.च्या मान्यतेने ठाण्यातील श्री मावळी मंडळातर्फे राज्यस्तरीय पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन चरई येथील भव्य पटांगणार करण्यात आले आहे. या स्पर्धेत रा.फ. नाईक, टागोर नगर मित्र, ज्ञानशक्ती युवा यांची महिला गटात, तर उत्कर्ष मंडळ, जय बजरंग व वाशिंद यांनी पुरुष गटात ५-५ चढाईच्या डावात विजयी सलामी दिली.



महिलांच्या सामन्यात रा.फ. नाईक संघाने शताब्दी स्पोर्टस्चा प्रतिकार ३४-३० असा मोडून काढला. रेखा चिकणे, भारती शेळके यांच्या चढाई पकडीच्या खेळमुळे रा. फ. नाईकने पूर्वार्धात लोण देत २१-१४ अशी आघाडी घेतली. परंतु, उत्तरार्धात शताब्दीच्या नंदिनी मौर्या, अनघा गायकवाड यांनी आपला खेळ गतिमान करीत लोणची परतफेड करीत सामन्यात चूरस निर्माण केली. परंतु, संघाला विजयी करण्यात त्या अपयशी ठरल्या. उपनगरच्या टागोर नगर मित्र मंडळाने ठाण्याच्या प्रेरणा कलाला २७-२३ असे नमवीत आगेकूच केली. प्रतिक्षा भागवत, सायली फाटक यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. प्रेरणाच्या साधना जाधवने एकाकी लढत दिली. ठाण्याच्या ज्ञानशक्ती युवाने उपनगरच्या स्वस्तिक मंडळावर ४७-२८ अशी मात केली. विश्रांतीला २ लोण देत २९-१४ अशी आघाडी घेणाऱ्या ज्ञानशक्तीने विश्रांतीनंतर आणखी एक लोण देत आपला विजय सोपा केला. हिमानी गायकवाड, यतिक्षा बागडे, पौर्णिमा देवरे यांच्या झंझावाती खेळाने ज्ञानशक्तीला १९ गुणांच्या फरकाने विजय मिळविता आला. स्वस्तिकच्या दिव्या तिरवडकर, वनिता यादव चमकल्या.

पुरुषांच्या लढती मात्र पहिल्या फेरीपासुन चुरशीच्या झाल्या. उपनगरच्या उत्कर्ष मंडळाने ५-५चढायांच्या डावात ठाण्याच्या विजय मंडळाला ४४-४३ (६-५) असे चकवीत आगेकूच केली. सुरुवातीपासुन चुरशीने खेळला गेलेल्या या सामन्यात पहिल्या डावात २०-१८ अशी उत्कर्ष कडे आघाडी होती. परंतु, पूर्ण डावात विजयने ३८-३८ अशा बरोबरीत सामना आणला. ५-५ चढायात मात्र उत्कर्षने बाजी मारली. दुसऱ्या सामन्यात जय बजरंग, वाशिंदने ५-५ चढायांत उपनगरच्या मुलुंड स्पोर्टस्चा ३५-३२ (८-५) असा पाडाव केला. मध्यंतराला १४-११ अशी जय बजरंगकडे आघाडी होती. पूर्ण डावात मुलुंड स्पोर्टस्ने २७-२७ अशा बरोबरीत सामना आणला. परंतु, ५-५ चढायांत त्यांना विजयाची किमया साधता आली नाही. श्री विठ्ठल मंडळाने श्रीराम कबड्डी संघाला ४३-२७ असे नमविले. उपनगरच्या शूर जवानने चुरशीच्या लढतीत ठाण्याच्या नवरत्न मंडळावर ४५-४३ असा विजय मिळविला. आक्रमक सुरुवात करीत २ लोण देत २५-१० अशी भक्कम आघाडी घेणाऱ्या शूर जवानला नंतर मात्र नवरत्नने चांगलेच जेरीस आणले. मध्यंतरा नंतर त्या २ लोणची परतफेड करीत सामना रंगतदार केला. परंतु, संघाला विजयी करण्याय ते कमी पडले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयआेनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)